सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

# सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७९

# मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८

(दिनांक १५ मार्च १९९७ पर्यंत सुधारित)

# Bombay Act No. LXXIX of 1948

## The Bombay Shops And Establishments Act, 1948

*(As modified up to 15th March 1997)*

*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामुग्री महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

2006

(किंमत : रु. ४२-००)

# मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८

## अनुक्रमणिका

**उद्देशिका**

**कलमे**

प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रवर्तन.

२. व्याख्या

३. दिवसाच्या वेळेसंबंधीचा संदर्भ.

४. माफी.

५. इतर आस्थापनांना व व्यक्तींना अधिनियम लागू करणे.

६. या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदी निलंबित करणे.

प्रकरण दोन

**आस्थापनांची नोंदणी**

७. आस्थापनांची नोंदणी.

८. बदलांबाबत निरीक्षकास कळविणे.

९. आस्थापना बंद केल्याचे निरीक्षकास कळविणे.

प्रकरण तीन

**दुकाने व व्यापारी आस्थापना**

१०. दुकाने उघडण्याच्या वेळा.

११. दुकाने बंद करण्याच्या वेळा.

१२. दुकाने उघडण्याच्या वेळेपूर्वी व बंद करण्याच्या वेळेनंतर फेरीने माल विकण्यास मनाई.

१३. वाणिज्यिक आस्थापना उघडण्याच्या व बंद करण्याच्या वेळा.

१४. दुकाने व वाणिज्यिक आस्थापना यातील रोजचे व आठवड्याचे कामाचे तास.

१५. विश्रांतीसाठी मधली सुट्टी.

१६. दुकानातील कामाच्या कालावधीचे कार्यकालयोजन.

१७. वाणिज्यिक आस्थापनेतील कार्यकालयोजन.

१८. दुकाने व वाणिज्यिक आस्थापना यातील आठवड्यातील सुट्टीचे दिवस.

## प्रकरण चार

## निवासी, हॉटेल, आहारगृहे व खाद्यगृहे

१९. आहारगृहे व खाद्यगृहे उघडण्याच्या व बंद करण्याच्या वेळा.

२०. दुकानात विकला जातो अशा प्रकारचा माल दुकाने उघडण्याच्या वेळेपूर्वी किंवा ती बंद करण्याच्या वेळेनंतर आहारगृहे व खाद्यगृहे यात न विकणे.

२१. निवासी हॉटेल, आहारगृहे व खाद्यगृहे यातील रोजचे व आठवड्याचे कामाचे तास.

२२. विश्रांतीसाठी मध्यंतर.

२३. कामाचे कार्यकालयोजन.

२४. आठवडी सुट्या.

२५. मालकाने कर्मचाऱ्यास ओळखपत्र पुरविणे.

## प्रकरण पाच

## नाट्यगृहे किंवा सार्वजनिक मनोरंजनाची अथवा करमणुकीची इतर ठिकाणे

२६. नाटगृहे किंवा सार्वजनिक मनोरंजनाची अथवा करमणुकीची इतर ठिकाणे बंद करण्याची वेळ.

२७. नाट्यगृहात किंवा सार्वजनिक मनोरंजनाच्या अथवा करमणुकीच्या इतर ठिकाणी दुकानात विकला जातो अशा प्रकारचा माल दुकाने बंद करण्याच्या वेळेनंतर न विकणे.

२८. नाट्यगृहे किंवा सार्वजनिक मनोरंजनाची अथवा करमणुकीची इतर ठिकाणे यातील रोजचे व आठवड्याचे कामाचे तास.

२९. विश्रांतीसाठी मध्यंतर.

३०. कार्यकालयोजन.

३१. आठवड्यातील सुटीचे दिवस.

## प्रकरण सहा

## बालके, अल्पवयीन व्यक्ती व स्त्रिया यांना कामावर लावणे.

३२. कोणत्याही बालकाने कोणत्याही आस्थापनेत काम न करणे.

३३. अल्पवयीन व्यक्तींच्या व स्त्रियांच्या काम सुरू करण्याच्या व बंद करण्याच्या वेळा.

३४. अल्पवयीन व्यक्तीचे रोजचे कामाचे तास.

३४-अ. अल्पवयीन व्यक्तीस आणि स्त्रियांस धोक्याच्या कामावर ठेवण्यात मनाई.

## प्रकरण सात

## वेतनी रजा व वेतन देणे

३५. रजा.

३६. रजेच्या काळातील वेतन.

३७. पैसे केव्हा द्यावेत.

३८. वेतन प्रदान अधिनियम लागू करणे व त्याची सुधारणा.

३८-अ. सन १९२३ चा अधिनियम क्रमांक ८ हा आस्थापनेतील कर्मचाऱ्यांना लागू असणे.

३८-ब. आस्थापनेला औद्योगिक सेवायोजन (स्थायी आदेश) अधिनियम लागू होणे.

३८-क. आस्थापनेतील स्त्री कर्मचाऱ्यांना प्रसूती लाभ अधिनियम लागू न होणे.

## प्रकरण आठ

## आरोग्य व सुरक्षितता

३९. स्वच्छता.

४०. वायुवीजन.

४१. दिवाबत्ती.

४२. आगीच्या बाबतीत सावधगिरीची उपाययोजना.

४२-अ. प्रथमोपचार.

## प्रकरण नऊ

## अंमलबजावणी आणि निरीक्षण

४३. स्थानिक प्राधिकरणाचे अधिकार व कर्तव्ये.

४४. उपविधी करण्याचा अधिकार.

४४-अ. स्थानिक प्राधिकरणांकडून अधिनियमाचे प्रशासन हाती घेण्यासाठी तरतूद.

४५. अधिकारांचे प्रत्यायोजन.

४६. स्थानिक प्राधिकरणाने कर्तव्ये बजावण्यात कसूर केली असता ती पार पाडण्याबाबत तरतूद करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

४७. स्थानिक प्राधिकरणाने केलेला खर्च त्याच्या अनुदानातून चुकता करणे.

४८. निरीक्षकांची नेमणूक.

४९. निरीक्षकांचे अधिकार व कर्तव्ये.

५०. निरीक्षक लोकसेवक असणे.

५१. मालकाने व व्यवस्थापकाने नोंदवही, कागदपत्रे वगैरे निरीक्षणासाठी हजर करणे.

## प्रकरण दहा

## अपराध व शास्ती

५२. विवक्षित तरतुदींचे उल्लंघन व अपराध.

५३. कलम १२ चे उल्लंघन.

५४. कलम १८ (२), २४, ३१, व ६५ यांचे उल्लंघन करणारे कर्मचारी.

५५. मालकाने व व्यवस्थाकाने केलेल्या खोट्या नोंदी.

५६. काही बाबतीत अगोदरच्या अपराध सिद्धीनंतर वाढवलेली शास्ती.

५७. निरीक्षकास अडथळे करण्याबद्दल शास्ती.

५८. या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता मालक निर्धारित करणे.

५९. विवक्षित प्रकरणांच्या बाबतीत मालकास किंवा व्यवस्थापकास दायित्व माफ करणे.

६०. अपराधांची दखल.

६१. खटल्याची मुदत.

## प्रकरण अकरा

## संकीर्ण व पूरक

६२. नोंदवह्या व कागदपत्र ठेवणे व नोटिसा लावणे.

६३. जादा वेळ काम केल्याबद्दल वेतन.

६४. वयासंबंधी पुरावा.

६५. सुटीच्या दिवशी किंवा रजेच्या अवधीत दुहेरी नोकरी करण्यावर निर्बंध.

६६. सेवा समाप्तीची नोटीस.

६७. नियम.

६८. या अधिनियमाखाली कृती करणाऱ्या व्यक्तीस संरक्षण.

६९. इतर कायद्याखाली असलेले अधिकार व विशेषाधिकार यास बाधा न येणे.

७०. कारखान्यात नोकरीला असलेल्या व्यक्तींना कारखाना अधिनियम लागू असणे व हा अधिनियम लागू नसणे.

७१. वार्षिक अहवाल इत्यादी सादर करणे.

७२. मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९३९ निरसित करणे.

अनुसूची एक.

अनुसूची एक-अ.

अनुसूची दोन.

## सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७९[१]
## [मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८]†

(११ जानेवारी, १९४८)

या अधिनियामात पुढील आदेश व अधिनियम याद्वारे अनुकूलन, फेरबदल व सुधारणा करण्यात आल्या आहेत :--

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७.
सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५३.
सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९.
सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ विधि अनुकूलन आदेश, १९५०.
सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९.
सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८.
सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८.
मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.
महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.
सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.
††सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६४.
(१ मे, १९७८).*
सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५.
शासकीय अधिसूचना, दिनांक ३० जून, १९८१.
शासकीय अधिसूचना, दिनांक ७ सप्टेंबर, १९८१.

**दुकाने, वाणिज्यिक आस्थापना, निवासी हॉटेले, उपाहारगृहे, खाद्यगृहे, थिएटरे व सार्वजनिक करमणुकीच्या किंवा मनोरंजनाच्या इतर जागा व इतर आस्थापना यातील कामाच्या व नोकरीच्या शर्तींचे विनियमन करण्याबाबतचा कायदा एकत्रित करण्याबाबत व सुधारणांबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** दुकाने, वाणिज्यिक आस्थापना, निवासी हॉटेले, उपाहारगृहे, खाद्यगृहे, थिएटरे व सार्वजनिक करमणुकीच्या किंवा मनोरंजनाच्या इतर जागा व इतर आस्थापना यांतील कामाच्या व नोकरीच्या शर्तींचे विनियमन करण्यासाठी आणि यात यापुढे दिलेल्या इतर कारणांसाठी संबंधित कायदा एकत्रित करणे व त्यात सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :--

### प्रकरण एक
### प्रारंभिक

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रवर्तन.

[२][(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.]

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई सरकार राजपत्र, १९४८, भाग पाच, पृष्ठ ४९९ (इंग्रजी) पहा.

† सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम २ अन्वये हा अधिनियम महाराष्ट्र राज्यातील उर्वरित भागास लागू करण्यात आला.

†† महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार, दिनांक ३ डिसेंबर, १९७७ पृष्ठ ३७२ ते ३७६ (इंग्रजी) यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आला व १ मे, १९७८ पासून अंमलात आला.

* अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

[२] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम ३ (अ) अन्वये पोट-कलम (२) बदली दाखल करण्यात आले.

(३) तो प्रथमतः परिशिष्ट एकमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्थानिक क्षेत्रात अंमलात येईल.

[१][परंतु, मुंबई दुकाने व आस्थापना (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम, १९६० अंमलात आल्यावर, या अधिनियमाच्या सर्व तरतूदी, मध्यप्रांत व वऱ्हाड दुकाने व अस्थापना अधिनियम, १९४७ किंवा हैदराबाद दुकाने व आस्थापना अधिनियम, १९५१ हे अशा प्रारंभाच्या निकटपूर्वी ज्या क्षेत्रांत अंमलात होते त्या क्षेत्रांपैकी प्रत्येक क्षेत्रातसुद्धा अंमलात येतील].

१९६१ चा महा. २६. १९४७ चा मध्य. व वऱ्हाड २२. १९५१. हैदराबाद १०.

(४) [२][राज्य] शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदी अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशी पंचवीस हजार व त्याहून अधिक लोकसंख्या असलेल्या इतर स्थानिक क्षेत्रात अंमलात येतील असे निदेश देता येतील.

(५) [२][राज्य] शासनास तशाच अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदी, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा पंचवीस हजारांहून कमी लोकसंख्या असलेल्या स्थानिक क्षेत्रात अंमलात आणता येतील असे निदेश देता येतील.

व्याख्या. **२.** या अधिनियमात, विषयात किंवा संदर्भात प्रतिकूल असे काही नसेल तर,--

(१) "शिकाऊ उमेदवार" या संज्ञेचा अर्थ, जी व्यक्ती कोणताही उदीम, कारागिरी, किंवा आस्थापना यांमधील प्रशिक्षण घेण्यासाठी--मग ते वेतनावर असो वा नसो,--नोकरीवर ठेवण्यात आली असेल अशी व्यक्ती असा असेल ;

[३][(२) "बाल" या संज्ञेचा अर्थ ज्या व्यक्तीचे वय पंधरा वर्ष पूर्ण नसेल अशी व्यक्ती, असा असेल ; मात्र मुंबई दुकाने व आस्थापना (सुधारणा) अधिनियम, १९७७ च्या प्रारंभाच्या तारखेपूर्वी जिचे वय बारा वर्षे पूर्ण इतके असेल अशी व्यक्ती जर उक्त तारखेच्या लगतपूर्वीच्या दिवशी, हा अधिनियम लागू असलेल्या कोणत्याही आस्थापनेत नोकरीस असेल तर, तिचे वय पंधरा वर्षे पूर्ण इतके नसले तरी, तिचा यात समावेश होत नाही ;]

[४][(३) "बंद" या संज्ञेचा अर्थ, कोणत्याही ग्राहकाच्या सेवेसाठी किंवा आस्थापनेच्या कोणत्याही धंद्यासाठी किंवा कोणत्याही कर्मचाऱ्याच्या मदतीने अथवा त्याची मदत घेऊन आस्थापनेचे किंवा अशा आस्थापनेशी संबंधित असलेले काम करण्यासाठी खुले नसणे असा असेल ;]

(४) "वाणिज्यिक आस्थापना" या संज्ञेचा अर्थ कोणताही धंदा, उदीम किंवा व्यवसाय अथवा कोणताही धंदा, उदीम किंवा व्यवसाय यांच्या संबंधातील अथवा त्याला आनुषंगिक अथवा सहाय्यभूत असे कोणतेही काम करणारी आस्थापना असा असेल [५][आणि तींत कोणत्याही विधि व्यवसायीच्या वैद्यक व्यवसायीच्या, वास्तुशास्त्रज्ञाच्या, अभियंत्याच्या, लेखापालाच्या, करसंमंत्रकाच्या किंवा इतर कोणत्याही तांत्रिक किंवा व्यावसायिक सल्लागाराच्या आस्थापनेचा समावेश होतो] आणि तीत, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० याअन्वये नोंदणी केलेल्या संस्थेचा तसाच, जी धर्मादाय अगर इतर विश्वस्तव्यवस्था--मग ती नोंदणीकृत असो वा नसो--तिच्याशी संबंधीत असलेला किंवा तिच्याशी आनुषंगिक किंवा सहाय्यभूत असलेला कोणताही धंदा, उदीम किंवा व्यवसाय किंवा काम चालवीत असेल--

१८६० चा २१.

---

[१] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, याच्या कलम ३ (ब) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९७७ चा महाराष्ट्र अधनियम क्रमांक ६४, कलम २ (अ) अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (२) दाखल करण्यात आला.

[४] सन १९६१ चा महाराष्ट्र अधनियम क्रमांक २६, कलम ४ (अ) अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (३) दाखल करण्यात आला.

[५] सन १९७७ चा महाराष्ट्र अधनियम क्रमांक ६४, कलम २ (ब) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[१][मग ते लाभार्थ असो वा नसो]--त्या विश्वस्तव्यवस्थेचाही समावेश होतो, मात्र तीत, कारखान्याचा, दुकानाचा, निवासी हॉटेलचा, उपाहारगृहाचा, खाद्यगृहाचा, थिएटरचा, अथवा सार्वजनिक करमणुकीच्या अथवा मनोरंजनाच्या इतर जागेचा समावेश, होत नाही ;

(५) "दिवस" या संज्ञेचा अर्थ, मध्यरात्रीपासून सुरू होणारा चोवीस तासांचा कालावधी असा असेल :

परंतु ज्या कर्मचाऱ्यांचे कामाचे तास मध्यरात्रीनंतरही असतात त्यांच्या बाबतीत दिवस म्हणजे, असा नोकरीधंदा जेव्हा सुरू होईल--मग त्यात मध्यरात्र येत असो अगर नसो--त्या वेळेपासून चोवीस तासांचा कालावधी ;

[२][(६) "कर्मचारी" या संज्ञेचा अर्थ, कोणत्याही आस्थापनेत किंवा आस्थापनेच्या संबंधात सर्वस्वी किंवा मुख्यतः नोकरीवर ठेवलेली व्यक्ती असा असेल--मग ती थेट नेमलेली असो अगर कोणत्याही अभिकरणामार्फत नेमलेली असो,--आणि वेतनावर नेमलेली असो किंवा इतर मोबदल्यावर नेमलेली असो ; व तीमध्ये शिकाऊ उमेदवाराचा समावेश होतो, मात्र मालकाच्या कुटुंबातील व्यक्तीचा समावेश होत नाही] ;

(७) "मालक" या संज्ञेचा अर्थ, आस्थापनेची मालकी असलेली किंवा त्या आस्थापनेच्या व्यवहारांवर अंतिम नियंत्रण असणारी व्यक्ती असा असेल ;

(८) "आस्थापना" या संज्ञेचा अर्थ, हा अधिनियम लागू असलेले कोणतेही दुकान, वाणिज्यिक आस्थापना, निवासी हॉटेल, उपाहारगृह, खाद्यगृह, थिएटर किंवा सार्वजनिक करमणुकीची अथवा मनोरंजनाची इतर जागा असा असेल आणि तीत [३][राज्य] शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी आस्थापना म्हणून घोषित करील अशा इतर आस्थापनेचा समावेश होतो ;

१९४८ चा ६३. (९) "कारखाना" या संज्ञेचा अर्थ, जी कोणतीही परिवास्तू [४][कारखाना अधिनियम १९४८ कलम २, खंड (म) च्या अर्थांतर्गत कारखाना आहे किंवा जी उक्त अधिनियमाचे कलम ८५ या अन्वये कारखाना असल्याचे मानण्यात येत असेल ती परिवास्तू असा असेल] ;

(१०) "माल" यामध्ये सर्व साहित्य, वस्तू व जिन्नस यांचा समावेश होतो ;

(११) "सुटी" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये ज्या दिवशी आस्थापना बंद राहील किंवा ज्या दिवशी कर्मचाऱ्यांस सुटी देण्यात येईल तो दिवस असा असेल ;

(१२) "निरीक्षक" या संज्ञेचा अर्थ, कलम ४८ अन्वये नेमलेला निरीक्षक असा असेल ;

(१३) "रजा" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रकरण सातमध्ये तरतूद केलेली रजा असा असेल ;

(१४) "स्थानिक क्षेत्र" या संज्ञेचा अर्थ, हा अधिनियम लागू असलेले कोणतेही क्षेत्र किंवा क्षेत्रसंयोग असा असेल ;

[५][(१५) "स्थानिक प्राधिकरण" या संज्ञेचा अर्थ, अनुसूची १-अ मध्ये विनिर्दिष्ट केलेली संस्था असा असेल व तीत त्या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे स्थानिक प्राधिकरण म्हणून जाहीर करील अशा इतर कोणत्याही संस्थेचा समावेश होतो];

---

[१] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम २(१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम ४(ब) अन्वये खंड (६) बदली दाखल करण्यात आला.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये, "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७, कलम २ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम ४ (क) अन्वये खंड (१५) बदली दाखल करण्यात आला.

(१६) "व्यवस्थापक" या संज्ञेचा अर्थ, कलम ७ अन्वये व्यवस्थापक म्हणून घोषित करण्यात आलेली व्यक्ती असा असेल ;

(१७) "मालकाच्या कुटुंबातील व्यक्ती" या संज्ञेचा अर्थ, मालकाबरोबर राहात असलेली व अशा मालकावर अवलंबून असलेली त्याची पत्नी, पती, मुलगा, मुलगी, वडील, आई, भाऊ किंवा, बहीण असा असेल ;

[१][(१८) "खुले" या संज्ञेचा अर्थ, कोणत्याही ग्राहकाची सेवा करण्यासाठी किंवा आस्थापनेच्या कोणत्याही धंद्यासाठी किंवा कोणत्याही कर्मचाऱ्याच्या मदतीने अथवा त्याची मदत घेऊन आस्थापनेचे किंवा आस्थापनेशी संबंधित असलेले काम करण्यासाठी खुले असा असेल ;

(१९) "कामाचा कालावधी" या संज्ञेचा अर्थ, ज्या अवधीत कर्मचारी मालकाच्या स्वाधीन असेल तो अवधी असा असेल ;

(२०) "विहित" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमान्वये विहित केलेले असा असेल ;

(२१) "विहित प्राधिकरण" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमान्वये विहित केलेले प्राधिकरण असा असेल ;

(२२) "आस्थापना नोंदवही" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमान्वये आस्थापनांची नोंदणी करण्यासाठी ठेवलेली नोंदवही असा असेल ;

(२३) "नोंदणी प्रमाणपत्र" या संज्ञेचा अर्थ, आस्थापनेची नोंदणी दर्शविणारे प्रमाणपत्र असा असेल ;

(२४) "निवासी हॉटेल" या संज्ञेचा अर्थ, राहण्यासाठी किंवा झोपण्यासाठी आलेल्या पाहुण्यांना आणि प्रवाशांना दाखल करून घेण्याकरिता वापरण्यात येणारी कोणतीही परिवास्तू असा असेल व तीत [२][निवासी क्लबचा] समावेश होतो ;

(२५) "उपाहारगृह किंवा खाद्यगृह" या संज्ञेचा अर्थ, ज्या कोणत्याही परिवास्तूत लोकांना किंवा एखाद्या विशिष्ट वर्गातील लोकांना जेवण किंवा अल्पोपाहार तेथल्या तेथेच सेवन करण्यासाठी पुरविण्याचा धंदा सर्वस्वी किंवा मुख्यत्वेकरून चालवण्यात येतो ती परिवास्तू असा असेल ;

(२६) "अनुसूची" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमास जोडलेली अनुसूची असा असेल ;

(२७) "दुकान" या संज्ञेचा अर्थ, ज्या कोणत्याही परिवास्तूत ग्राहकांना माल किरकोळीने किंवा घाऊक विकण्यात येतो किंवा सेवा पुरवण्यात येते ती परिवास्तू, असा असेल व तीत अशा उदीमाच्या किंवा धंद्याच्या संबंधात [३][मुख्यत्वेकरून वापरण्यात येणारे] कार्यालय, भांडारकक्ष, गोदाम, वखार किंवा कामाची जागा यांचा समावेश होतो—मग ती त्याच परिवास्तूत असो किंवा इतरत्र असो--मात्र त्यात कारखाना, वाणिज्यिक आस्थापना, निवासी हॉटेल, उपाहारगृह, खाद्यगृह, थिएटर किंवा सार्वजनिक मनोरंजनाची किंवा करमणुकीची इतर जागा यांचा समावेश होत नाही ;

(२८) "कार्यकालयोजन" या संज्ञेचा अर्थ, कोणत्याही दिवशी कर्मचाऱ्याचा कामास सुरुवात केल्यापासून ते संपेपर्यंतचा कालावधी असा असेल ;

(२९) "थिएटर" यामध्ये चलचित्राच्या किंवा इतर तदनुरूप उपकरणसंचाच्या सहाय्याने चित्रे किंवा इतर दृश्यचित्रे दाखवण्यासाठी किंवा नाट्यप्रयोग करण्यासाठी किंवा कोणत्याही इतर सार्वजनिक मनोरंजनासाठी अथवा करमणुकीसाठी जी मुख्यत्वेकरून किंवा सर्वस्वी वापरण्याचे योजिले असेल, अशा कोणत्याही परिवास्तूचा समावेश होतो ;

---

[१] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम ४ (ड) अन्वये खंड (१८) बदली दाखल करण्यात आला.

[२] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९, कलम ३, दुसरी अनुसूची या अन्वये "क्लब" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम २ (३) अन्वये "वापरण्यात येणारे" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

१९३६ चा ४. (३०) "वेतन" या संज्ञेचा अर्थ, वेतन प्रदान अधिनियम, १९३६ यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेले वेतन असा असेल ;

(३१) "आठवडा" या संज्ञेचा अर्थ, शनिवारच्या मध्यरात्रीपासून सुरू होणारा सात दिवसांचा कालावधी असा असेल ;

[१][(३२) "वर्ष" या संज्ञेचा अर्थ, जानेवारी महिन्याच्या पहिल्या तारखेपासून सुरू होणारे वर्ष असा असेल ;

(३३) "अल्पवयीन व्यक्ती" या संज्ञेचा अर्थ, जी बालक नाही व जिचे वय सतरा वर्षे पूर्ण इतके नाही अशी व्यक्ती असा असेल ;

**३.** या अधिनियमात केलेले दिवसाच्या वेळेसंबंधीचे संदर्भ हे भारतीय प्रमाण वेळेस अनुलक्षून केलेले संदर्भ असून ही प्रमाण वेळ ग्रीनिच मीन टाईमपेक्षा साडेपाच तासांनी पुढे असते. दिवसाच्या वेळेसंबंधीचा संदर्भ

**४.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, अनुसूची दोनच्या तिसऱ्या स्तंभात नमूद केलेल्या या अधिनियमाच्या तरतुदी उक्त अनुसूचीच्या दुसऱ्या स्तंभात नमूद केलेल्या आस्थापना कर्मचाऱ्यांना व इतर व्यक्तींना लागू होणार नाहीत : माफी.

परंतु, [२][राज्य] **शासनास, राजपत्रात** प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे, [३][अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा कोणत्याही शर्ती असल्यास, त्यांच्या अधीनतेने] उक्त अनुसूचीत जादा नोंदी दाखल करता येतील किंवा त्यातील कोणत्याही नोंदी वगळता येतील किंवा त्यात फेरफार करता येतील आणि अशा अधिसूचना प्रसिध्द करण्यात आल्यावर उक्त अनुसूचीच्या दोन्ही स्तंभातील नोंदीमध्ये त्याप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे असे मानण्यात येईल.

**५.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, [२][राज्य] शासनास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, हा अधिनियम किंवा त्याच्या कोणत्याही तरतुदी त्या त्यावेळी ज्यास लागू नसतील अशा कोणत्याही आस्थापनेस किंवा आस्थापनांच्या वर्गास किंवा अशा कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींच्या वर्गास [२][राज्य] शासनास आवश्यक वाटतील असे फेरबदल किंवा अनुकूलन यांसह अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेपासून लागू होतील असे घोषित करता येईल. इतर आस्थापनांना व व्यक्तींना अधिनियम लागू करणे.

(२) पोटकलम (१) खाली अशी घोषणा करण्यात आल्यावर कोणतीही अशी आस्थापना किंवा आस्थापनांचा वर्ग किंवा अशी व्यक्ती किंवा व्यक्तींचा वर्ग हा जिला हा अधिनियम लागू होतो अशी आस्थापना किंवा आस्थापनांचा वर्ग किंवा असा कर्मचारी किंवा कर्मचारी वर्ग आहे असे मानण्यात येईल ; आणि या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदी या, अशा घोषणेत विनिर्दिष्ट करण्यात येईल असे अनुकूलन किंवा फेरबदल यांसह, अशा आस्थापनेस किंवा आस्थापनांच्या वर्गास किंवा अशा कर्मचाऱ्यास किंवा कर्मचारी वर्गास लागू होतील.

**६.** [२][राज्य] शासनास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदींचे प्रवर्तन कोणत्याही सुटीच्या कारणास्तव किंवा कोणत्याही प्रसंगाच्या कारणास्तव त्यास योग्य वाटेल अशा कालावधीकरिता व अशा शर्तीच्या अधीनतेने निलंबित करता येईल. याअधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदी निलंबित करणे.

---

[१] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम ४ (क) अन्वये खंड (३२) बदली दाखल करण्यात आला.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम ३ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

## प्रकरण दोन

## आस्थापनांची नोंदणी

आस्थापनांची नोंदणी. **७.** (१) पोट-कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत प्रत्येक आस्थापनेचा मालक संबंधित स्थानिक क्षेत्राच्या निरीक्षकाकडे विहित नमुन्यात पुढील गोष्टी नमूद केलेले एक विवरण पाठवील व त्यासह विहित करण्यात येईल अशी फी पाठवील :--

(अ) मालकाचे व व्यवस्थापक असल्यास, त्याचे नाव ;

(ब) आस्थापनेचा डाकपत्ता ;

(क) आस्थापनेचे नाव, कोणतेही असल्यास ;

(ड) आस्थापनेचा प्रवर्ग म्हणजे, ती दुकान, वाणिज्यिक संस्था, निवासी हॉटेल, उपाहारगृह, खाद्यगृह, थिएटर किंवा करमणुकीची इतर जागा आहे किंवा काय ते ; आणि

(ई) विहित करण्यात येतील असे इतर तपशील.

(२) विवरण व फी मिळाल्यावर, विवरण बिनचूक आहे याविषयी त्याची खात्री झाल्यावर निरीक्षक, आस्थापनेची नोंदणी, विहित करण्यात येईल अशारीतीने आस्थापनेच्या नोंदवहीत करील आणि मालकास विहित करण्यात येईल अशा नमुन्यात नोंदणी प्रमाणपत्र देईल. असे नोंदणी प्रमाणपत्र आस्थापनेत ठळक जागी लावण्यात येईल.

[१][(२-अ) पोटकलम (२) खाली देण्यात आलेले नोंदणी प्रमाणपत्र ते ज्या वर्षाकरिता देण्यात आले असेल त्या वर्षाच्या अखेरपर्यंत विधिग्राह्य असेल. नोंदणी प्रमाणपत्राच्या नवीकरणासाठी करावयाचा अर्ज यथास्थिति, नोंदणी प्रमाणपत्राची किंवा नवीकरण केलेल्या प्रमाणपत्राची तारीख संपण्यापूर्वी पंधरा दिवसांहून कमी नसेल इतक्या अवधीत सादर करण्यात येईल आणि त्यासोबत विहित करण्यात येईल अशी फी भरण्यात येईल तसेच नवीकरण केलेले प्रमाणपत्र हे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल.]

[२][(२अअ) नोंदणी प्रमाणपत्राच्या नवीकरणासाठी करावयाचा अर्ज पोट-कलम (२अ) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेला कालावधी समाप्त झाल्यानंतर परंतु नोंदणी प्रमाणपत्राच्या किंवा यथास्थिति नवीकरण केलेल्या प्रमाणपत्राच्या समाप्तीच्या तारखेनंतर तीस दिवसांच्या आत करण्यात आला असेल अशाबाबतीत अशा अर्जासोबत नोंदणी प्रमाणपत्राच्या नवीकरणासाठी देय असलेल्या फीच्या निम्म्या रकमेइतकी जादा फी विलंब शुल्क म्हणून भरण्यात येईल.]

[३][(२-ब) या कलमाच्या पूर्ववर्ती पोट-कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (२) खाली दिलेले किंवा कलम (२-अ) खाली नमूद करण्यात आलेले नोंदणी प्रमाणपत्र मालकाच्या विकल्पानुसार एका वेळी तीन वर्षांच्या कालावधीसाठी त्या कालावधीची फी भरल्यानंतर देता येईल किंवा त्याचे नवीकरण करता येईल ; त्यामुळे ते दिल्याच्या किंवा यथास्थिति त्यांचे नवीकरण केल्याच्या वर्षापासून आणि ते वर्ष धरून, तिसरे वर्ष समाप्त होईपर्यंत ते विधिग्राह्य राहील.]

---

[१] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम ५ अन्वये पोट-कलमे (२-अ) व (२-ब) समाविष्ट करण्यात आली.

[२] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम २ अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६४, याच्या कलम ३ अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी पोट-कलम (२-ब) दाखल करण्यात आले.

(३) आस्थापना कोणत्या प्रवर्गात मोडते याविषयी कोणतीही शंका किंवा मालक व निरीक्षक यांच्या दरम्यान मतभेद निर्माण झाल्यास, निरीक्षक ती बाब विहित प्राधिकरणाकडे पाठवील आणि ते प्राधिकरण त्यास योग्य वाटेल अशी चौकशी करून अशा आस्थापनेचा प्रवर्ग कोणता याचा निर्णय करील आणि त्याने याबाबत दिलेला निर्णय या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता अंतिम असेल.

(४) खालील स्तंभ (१) मध्ये नमूद केलेल्या आस्थापनेच्या बाबतीत स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, पोट-कलम (१) खाली निरीक्षकाकडे विवरण व फी पाठविण्यात येईल :--

| आस्थापना<br>(१) | ज्या तारखेपासून ३० दिवसांच्या कालावधीचा प्रारंभ होईल ती तारीख<br>(२) |
|---|---|
| (एक) हा अधिनियम अंमलात आला त्या तारखेस, अनुसूची एक मध्ये नमूद केलेल्या स्थानिक क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या आस्थापना. | ज्या तारखेत हा अधिनियम अंमलात आला असेल ती तारीख. |
| (दोन) हे कलम अंमलात आले त्या तारखेस स्थानिक क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या आस्थापना. | ज्या तारखेस हे कलम स्थानिक क्षेत्रात अंमलात आले असेल ती तारीख. |
| (तीन) अनुसूची एकमध्ये नमूद केलेल्या स्थानिक क्षेत्रांतील व ज्यांत हे कलम अंमलात आले असेल अशा इतर स्थानिक क्षेत्रांतील नवीन आस्थापना. | ज्या तारखेस आस्थापनेने कामास प्रारंभ केला असेल ती तारीख. |

**८.** [1][कलम ७ खाली सादर केलेल्या विवरणातील कोणत्याही तपशीलात कोणताही बदल झाला असेल तर तो, घडून आल्यानंतर कोणत्याही आस्थापनेच्या किंवा आस्थापनांच्या कोणत्याही वर्गाच्या बाबतीत राज्य शासन विहित करील अशा कालावधीत तो बदल] विहित नमुन्यामध्ये निरीक्षकास अधिसूचित करणे हे मालकाचे कर्तव्य असेल. निरीक्षक अशी नोटीस व विहित फी मिळाल्यावर, तसेच ती बिनचूक आहे याची खात्री झाल्यावर असा बदल अशा नोटिशीस अनुसरून आस्थापनांच्या नोंदवहीत करील आणि नोंदणी प्रमाणपत्रात सुधारणा करील किंवा आवश्यक असल्यास नवीन नोंदणी प्रमाणपत्र देईल. बदलांबाबत निरीक्षकास कळविणे.

**९.** आस्थापना बंद केल्यावर दहा दिवसांच्या आत मालक निरीक्षकास त्याप्रमाणे लेखी कळवील. निरीक्षक अशी माहिती मिळाल्यावर व ती बिनचूक असल्याविषयी त्याची खात्री झाल्यावर अशा आस्थापनेचे नाव आस्थापनांच्या नोंदवहीतून काढून टाकील व नोंदणीप्रमाणपत्र रद्द करील : आस्थापना बंद केल्याचे निरीक्षकास कळविणे.

[2][परंतु, निरीक्षकास अशी माहिती मिळाली नसेल पण आस्थापना बंद झाल्याची त्याची अन्यथा खात्री झाली असेल तर, त्यास अशा आस्थापनेचे नाव अशा नोंदवहीतून काढून टाकता येईल व असे प्रमाणपत्र रद्द करता येईल.]

[1] सन १९५२ च्या मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम ४ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ५ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

## प्रकरण तीन

## दुकाने व व्यापारी आस्थापना

दुकाने उघडण्याच्या वेळा.

**१०.** (१) (अ) सर्वस्वी दूध, भाजीपाला, फळफळावळ, मासळी, मांस, पाव किंवा [१][राज्य] शासन अधिसूचित करील असा कोणताही इतर माल यांचा व्यवहार करणारे कोणतेही दुकान कोणत्याही दिवशी सकाळी ५-०० वाजण्यापूर्वी उघडता येणार नाही ;

(ब) खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या [२] * * दुकानांहून अन्य कोणतेही दुकान सकाळी ७-०० वाजण्यापूर्वी उघडता येणार नाही ;

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींच्या अधीनतेने [१][राज्य] शासनास दुकानांच्या निरनिराळ्या वर्गांसाठी किंवा निरनिराळ्या क्षेत्रासाठी किंवा वर्षभरातील निरनिराळ्या कालावधीसाठी दुकाने उघडण्याच्या त्याहून उशिराच्या वेळा ठरविता येतील.

दुकाने बंद करण्याच्या वेळा.

**११.** (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर अधिनियमितीत काहीही अंतर्भूत असले तरी,--

(अ) या पोट-कलमाच्या खंड (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या [२] * * * दुकानांहून अन्य कोणतेही दुकान कोणत्याही दिवशी रात्री ८-३० पेक्षा उशीरा बंद करता येणार नाही.

(ब) पानं, बिडी, सिगारेट, आगपेट्या व त्यासाठी लागणाऱ्या इतर वस्तू [३][यांचाच मुख्यत्वेकरून व्यापार करणारे कोणतेही दुकान] रात्री ११-०० पेक्षा उशिरा बंद करता येणार नाही :

परंतु, दुकान बंद करण्याच्या अशा वेळी कोणत्याही दुकानात कोणत्याही गिऱ्हाईकाला सेवा देण्यात येत असेल किंवा ते त्यासाठी थांबले असेल तर, अशा वेळेच्या लगतनंतरच्या पाव तासात त्याला सेवा देता येईल.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींच्या अधीनतेने [१][राज्य] शासनास, दुकानांच्या निरनिराळ्या वर्गांसाठी किंवा निरनिराळ्या क्षेत्रांसाठी किंवा वर्षातील निरनिराळ्या कालावधीसाठी दुकाने बंद करण्याच्या त्याहून लवकरच्या वेळा निश्चित करता येतील.

दुकाने उघडण्याच्या वेळेपूर्वी व बंद करण्याच्या वेळेनंतर फेरीने माल विकण्यास मनाई.

**१२.** (१) कोणत्याही व्यक्तीला सडकेवर किंवा सार्वजनिक जागेत किंवा तिच्या आसपास अशी सडक किंवा सार्वजनिक जागा ज्या वसतिस्थानात असेल त्या वसतिस्थानात ज्या वर्गातील मालाचा व्यवहार करणाऱ्या दुकानांसाठी कलम १० व ११ खाली दुकाने उघडण्याची जी वेळ निश्चित केलेली असेल त्यावेळेपूर्वी व दुकाने बंद करण्याची जी वेळ निश्चित केलेली असेल त्या वेळेनंतर त्याच वर्गातील कोणताही माल विकता येणार नाही :

[४][परंतु, या पोट-कलमातील कोणतीही गोष्ट वृत्तपत्रांच्या विक्रीस लागू होणार नाही.]

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५३, कलम २, पहिली अनुसूची अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[३] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम ६ अन्वये "यांचा व्यापार करणारे कोणतेही दुकान" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ७ अन्वये हे परन्तुक जादा दाखल करण्यात आले.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती निरीक्षकांकडून तिच्या मालाचे अधिग्रहण होण्यास पात्र होईल.

[१][(३) पोट-कलम (२) खाली ज्या व्यक्तीच्या मालाचे अधिग्रहण करण्यात आले असेल तिने न्यायालयात हजर राहण्याबद्दल प्रतिभूती म्हणून पंचवीस रुपये जमा केल्यावर असा माल तिला परत करण्यात येईल.

(४) अशा व्यक्तीने रक्कम जमा न केल्यास अधिग्रहण केलेला माल विनाविलंब दंडाधिकाऱ्यापुढे हजर करण्यात येईल आणि दंडाधिकारी तो माल तात्पुरता अभिरक्षेत ठेवण्यासाठी त्यास योग्य वाटतील असे निदेश देऊ शकेल.

(५) पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल दंडाधिकारी त्याबाबत ठरवील अशा कालावधीत कोणताही खटला न भरल्यास दंडाधिकारी, असा माल त्याचे ज्या व्यक्तीकडून अधिग्रहण करण्यात आले असेल त्या व्यक्तीस परत करण्याचा निदेश देईल.

१८९८ चा ५. (६) निकटपूर्वीच्या पोट-कलमाच्या तरतुदींच्या अधीनतेने फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८, च्या तरतुदी, त्या लागू करण्याजोग्या असतील तेथवर या कलमाखाली अधिग्रहण केलेल्या मालाची विल्हेवाट करण्याबाबत लागू होतील.]

**१३.** (१) कोणतीही वाणिज्यिक आस्थापना कोणत्याही दिवशी सकाळी ८-३० पूर्वी उघडण्यात येणार नाही व रात्री ८-३० पेक्षा उशिरा बंद करण्यात येणार नाही. वाणिज्यिक आस्थापना उघडण्याच्या व बंद करण्याच्या वेळा.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींच्या अधीनतेने, [२][राज्य] शासनास, व्यापारी आस्थापनांच्या निरनिराळ्या वर्गांसाठी किंवा निरनिराळ्या क्षेत्रांसाठी किंवा वर्षातील निरनिराळ्या कालावधींसाठी अशा आस्थापना उघडण्याच्या त्याहून उशिराच्या वेळा किंवा अशा आस्थापना बंद करण्याच्या त्याहून अगोदरच्या वेळा निश्चित करता येतील.

**१४.** (१) या अधिनियमाच्या [३][इतर] तरतुदींच्या अधीनतेने किंवा कोणत्याही दुकानात किंवा वाणिज्यिक आस्थापनेत कोणत्याही कर्मचाऱ्यास कोणत्याही दिवशी नऊ तासांपेक्षा अधिक तास आणि कोणत्याही आठवड्यांत अठ्ठेचाळीस तासांपेक्षा अधिक तास, काम करण्यास लावता येणार नाही किंवा त्यास काम करण्याची मुभा देता येणार नाही ; दुकाने व वाणिज्यिक आस्थापना यांतील रोजचे व आठवड्याचे कामाचे तास.

(२) कोणत्याही दुकानात किंवा वाणिज्यिक आस्थापनेत कोणत्याही कर्मचाऱ्यास पोट-कलम (१) खाली निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक कालावधीकरिता काम करण्यास लावता येईल किंवा काम करण्याची मुभा देता येईल. मात्र असा कालावधी कोणत्याही आठवड्यात [४][सहा तासांपेक्षा] अधिक असता कामा नये.

(३) हिशेब करणे, मालमोजणी करणे, हिशेब नक्की करणे, यासाठी किंवा इतर विहित प्रसंगानिमित्त [२][राज्य] शासन यासाठी नियम तयार करून निश्चित करील अशा, वर्षातून सहापेक्षा अधिक नसतील इतक्या

---

[१] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम ६ अन्वये परंतुकाऐवजी पोट-कलमे (३) ते (६) दाखल करण्यात आली.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६४, कलम ४ (अ) अन्वये हा शब्द जादा दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ४ (ब) अन्वये "तीन तासांपेक्षा" या शब्दांऐवजी हे शब्द बदली दाखल करण्यात आले.

दिवशी, कोणत्याही कर्मचाऱ्यास दुकानात किंवा वाणिज्यिक आस्थापनेत पोट-कलम (१) खाली निश्चित केलेला कालावधी हा चोवीस तासांपेक्षा अधिक नसेल तर तेवढ्या कालावधीकरिता काम करण्यास लावता येईल किंवा काम करण्याची मुभा देता येईल.

विश्रांतीसाठी मधली सुट्टी.

**१५.** [१][दुकानातील किंवा वाणिज्यिक आस्थापनेतील कर्मचाऱ्यांच्या रोजच्या कामाचा कालावधी अशा रीतीने निश्चित करण्यात येईल की, जेणेकरून अखंडित कामाचा कोणताही कालावधी पाच तासांपेक्षा अधिक असणार नाही आणि कोणत्याही कर्मचाऱ्यास विश्रांतीसाठी निदान एक तास मधली सुटी दिल्याखेरीज पाच तासांपेक्षा अधिक कालावधीपर्यंत काम करण्यास भाग पाडता किंवा काम करण्याची मुभा देता येणार नाही] :

[२][परंतु,--

(अ) कोणत्याही उत्पादनाची प्रक्रिया करणाऱ्या वाणिज्यिक आस्थापनेतील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, विश्रांतीची मधली सुटी कमीत कमी अर्ध्या तासाची असेल ; आणि

(ब) इतर कोणत्याही कर्मचाऱ्यांच्या बाबतीत राज्य शासन [३][जेथे असा संघ असेल तेथे त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये मान्यताप्राप्त असलेल्या संघाने, किंवा जेथे असा संघ नसेल तेथे संबंधित बहुसंख्य नोकरांनी] त्याबाबत अर्ज केल्यावर विश्रांतीसाठी असलेली मधली सुटी अर्ध्या तासापर्यंत कमी करण्याची परवानगी देऊ शकेल.]

दुकानांतील कामाच्या कालावधीचे कार्यकाल-योजन.

**१६.** दुकानातील कर्मचाऱ्यांचे कार्यकालयोजन कोणत्याही दिवशी अकरा तासांपेक्षा अधिक असणार नाही ;

परंतु, जेव्हा कोणतेही दुकान कोणत्याही दिवशी सलत तीन तासांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीपर्यंत पूर्णपणे बंद असेल तेव्हा, कार्यकालयोजन त्या दिवशी बारा तासांपेक्षा अधिक असता कामा नये :

आणखी असे की, जेव्हा एखादा कर्मचारी कोणत्याही दिवशी कलम १४, पोट-कलम (२) च्या तरतुदींनुसार काम करील तेव्हा, कार्यकालयोजन हे कोणत्याही अशा दिवशी चौदा तासांपेक्षा अधिक असणार नाही, आणि जेव्हा तो कोणत्याही दिवशी उक्त कलमाच्या पोट-कलम (३) च्या तरतुदींस अनुसरून काम करील तेव्हा, कोणत्याही अशा दिवशी कार्यकालयोजन हे, सोळा तासांपेक्षा अधिक असणार नाही.

वाणिज्यिक आस्थापनेतील कार्यकाल-योजन.

**१७.** वाणिज्यिक आस्थापनेतील कर्मचाऱ्यांचे कार्यकालयोजन हे, कोणत्याही दिवशी अकरा तासांपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु [४][राज्य] शासनास सर्वसाधारणपणे किंवा विशिष्ट वाणिज्यिक आस्थापनेच्या बाबतीत किंवा वाणिज्यिक आस्थापनांच्या वर्गाच्या किंवा वर्गांच्या बाबतीत ते ज्या शर्ती घालील त्या शर्तींच्या अधीनतेने कार्यकालयोजनाची व्याप्ती वाढवता येईल.

---

[१] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम ७ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम १५ दाखल करण्यात आले.

[२] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २६, कलम ८ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[३] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ६४, कलम १५ अन्वये "संबंधित कर्मचाऱ्यांनी" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

**१८.** [1][(१) प्रत्येक दुकान व वाणिज्यिक आस्थापना आठवड्यातून एक दिवस बंद राहील. [2][पोट-कलम (१-ब) च्या तरतुदींअन्वये दिवस ठरविण्यात आला असेल तर ते खेरीज करून] दुकान किंवा आस्थापना ज्या दिवशी बंद राहील त्या दिवसाचे कॅलेंडर किंवा यादी वर्षाच्या सुरुवातीला मालक तयार करील व ते कॅलेंडर किंवा यादी निरीक्षकास कळवील. तसेच, दुकानात किंवा वाणिज्यिक आस्थापनेत एखाद्या ठळक जागी सहज दिसेल अशा रीतीने लावावयाच्या नोटिशीत ते विनिर्दिष्ट करील :

दुकाने व वाणिज्यिक आस्थापना यांतील आठवड्यातील सुटीचे दिवस.

[3][परंतु, दुकान किंवा आस्थापना कोणत्याही वर्षात ज्या दिवशी बंद राहील त्या दिवसांच्या कॅलेंडरमध्ये किंवा यादीत कोणताही बदल करण्यात आला नसेल, असे कॅलेंडर किंवा यादी पूर्वोक्त प्रमाणे पुन्हा अधिसूचित करण्याची आवश्यकता असणार नाही.

आणखी असे की, कोणतेही दुकान किंवा वाणिज्यिक आस्थापना कोणत्याही वर्षाच्या सुरुवातीनंतर प्रथमच या अधिनियमाच्या कक्षेत येईल त्या बाबतीत, मालक, त्या वर्षाच्या उरलेल्या भागात असे दुकान किंवा आस्थापना ज्या दिवशी बंद राहील त्या दिवसांचे कॅलेंडर किंवा यादी तयार करील व असे कॅलेंडर किंवा यादी उक्त दुकाने किंवा आस्थापना याप्रमाणे या अधिनियमाच्या कक्षेत ज्या तारखेस येईल त्या तारखेपासून एक महिन्याच्या आत निरीक्षकास कळवील.]

**(१-अ)** पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, [4][पण पोट-कलम (१-ब) अन्वये दिवस ठरविण्यात आला असेल ते खेरीज करून],

(अ) जर कोणतेही दुकान किंवा वाणिज्यिक आस्थापना आठवड्यात कोणत्याही इतर दिवशी बंद राहील ; आणि

(ब) जर असे दुकान किंवा यथास्थिति, वाणिज्यिक आस्थापना खंड (अ) खाली बदललेल्या दिवशी बंद ठेवण्याचा आपला इरादा आहे याबद्दल मालक निरीक्षकास बदललेल्या दिवसापूर्वी किंवा पोट-कलम (१) खाली. जो दिवस दुकाने किंवा आस्थापना बंद राहण्याचा दिवस म्हणून अधिसूचित केलेला असेल त्या दिवसापूर्वी यांपैकी जो दिवस आधीचा असेल त्या दिवसापूर्वी निदान सात दिवस अगोदर कळवील :

तर असे दुकान किंवा वाणिज्यिक आस्थापना पोट-कलम (१) मध्ये जो कोणताही दिवस दुकान किंवा वाणिज्यिक आस्थापना बंद राहण्याचा दिवस म्हणून जाहीर केला असेल त्या दिवशी खुली ठेवता येईल.]

[5][(१-ब) स्थानिक प्राधिकरणास आपल्या अधिकारितेतील कोणत्याही क्षेत्राच्या बाबतीत आणि राज्य शासनास इतरत्र असलेल्या कोणत्याही क्षेत्राच्या बाबतीत प्रातिनिधिक अधिसंघाशी विचारविनियम केल्यानंतर किंवा असा प्राधिकरणास किंवा राज्य शासनास, प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या आदेशांची झळ पोहोचलेल्या मालकाची किंवा कर्मचाऱ्यांची मते आजमावून पाहाण्याच्या दृष्टीने योग्य वाटेल अशा अन्य प्रकारे, विहित रीतीने प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे ज्या दिवशी दुकाने किंवा वाणिज्यिक आस्थापना बंद राहील तो दिवस निश्चित करता येईल व अशा

---

[1] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम ८ (१) अन्वये मूळ पोट-कलम (१) ऐवजी पोट-कलम (१) व (१-अ) दाखल करण्यात आला.

[2] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम ९ (अ) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ९ (अ) अन्वये ही परंतुके जादा दाखल करण्यात आली.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ९ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ९ (क) अन्वये पोट-कलम (१-ब) समाविष्ट करण्यात आला.

कोणत्याही आदेशाद्वारे त्या क्षेत्रातील सर्व दुकानांकरिता किंवा वाणिज्यिक आस्थापनांकरिता एकच दिवस निश्चित करता येईल किंवा,--]

(अ) दुकाने व वाणिज्यिक आस्थापना यांच्या वेगवेगळ्या वर्गांसाठी वेगवेगळा दिवस, किंवा

(ब) क्षेत्राच्या किंवा स्थानिक क्षेत्राच्या वेगवेगळ्या भागांसाठी वेगवेगळा दिवस, किंवा

(क) वर्षाच्या वेगवेगळ्या कालावधीसाठी वेगवेगळा दिवस

निश्चित करता येईल आणि त्यानंतर प्रत्येक दुकान किंवा वाणिज्यिक आस्थापना याप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या दिवशी बंद राहील; मात्र, ज्या दुकानाच्या किंवा वाणिज्यिक आस्थापनेच्या मालकाने, परक्राम्य लेख अधिनियम, १८८१ याच्या अर्थांतर्गत असलेल्या सार्वजनिक सुटीच्या दिवशी, आपले दुकान किंवा वाणिज्यिक आस्थापना बंद ठेवण्याचा आपला इरादा आहे, याबाबत त्या वर्षाच्या सुरुवातीस निरीक्षकास कळवले असेल, अशा दुकानास किंवा वाणिज्यिक आस्थापनेस या पोट-कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.] १८८१ चा २६.

(२) मालकाने आपले दुकान किंवा आस्थापना ज्या दिवशी बंद असेल त्या दिवशी कर्मचाऱ्यास, अशा दुकानाच्या किंवा वाणिज्यिक आस्थापनेच्या धंद्याशी संबंध आलेल्या कोणत्याही कामांसाठी दुकानात किंवा वाणिज्यिक आस्थापनेत किंवा कोणत्याही इतर जागी बोलावणे किंवा कर्मचाऱ्याने अशा दिवशी अशा कामासाठी अशा दुकानात, वाणिज्यिक आस्थापनेत किंवा जागेत जाणे विधिसंमत असणार नाही.

(३) ज्या कोणत्याही दिवशी असे दुकान किंवा वाणिज्यिक आस्थापना या कलमासाठी बंद राहील त्या दिवसाबद्दल दुकानातील किंवा वाणिज्यिक आस्थापनेतील कोणत्याही कर्मचाऱ्याच्या वेतनातून कोणतीही रक्कम कापून घेतली जाणार नाही. कोणताही कर्मचारी रोजंदारीवर कामावर ठेवण्यात आला असेल तरीही, ज्या दिवशी असे दुकान किंवा अशी वाणिज्यिक आस्थापना बंद राहील त्या दिवसाबद्दल त्यास त्याची रोजंदारी दिली जाईल. [१][कोणत्याही कर्मचाऱ्यास उक्त्या कामाच्या दराने वेतन देण्यात येत असेल तरीही, त्यास ज्या दिवशी दुकान किंवा वाणिज्यिक आस्थापना बंद राहील त्या दिवसाबद्दल, अशा दिवसाच्या निकटपूर्वीच्या सहा दिवसात जितके दिवस तो प्रत्यक्ष काम करील तितक्या दिवसांबद्दलच्या त्याच्या रोजंदारीच्या-त्यातील अतिकालिक कामाच्या संबंधातील कोणतीही कमाई सोडून-सरासरी वेतनाइतके वेतन देण्यात येईल] :

[२][परंतु, ज्या कोणत्याही व्यक्तीचा अखंडित सेवेचा कालावधी सहा महिन्यांपेक्षा कमी असेल, त्या व्यक्तीला या पोट-कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.]

## प्रकरण चार

## निवासी हॉटेल, आहारगृहे व खाद्यगृहे

आहारगृहे व खाद्यगृहे उघडण्याच्या व बंद करण्याच्या वेळा.

**१९.** (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर अधिनियमितीत काहीही असले तरी, कोणतेही आहारगृह किंवा खाद्यगृह हे सेवेसाठी कोणत्याही दिवशी सकाळी पाच वाजण्यापूर्वी उघडता येणार नाही व मध्यरात्री १२ पेक्षा उशिरा बंद करता येणार नाही :

परंतु, अशा आहारगृहातील किंवा खाद्यगृहातील कर्मचाऱ्यास सकाळी ४-३० पेक्षा लवकर नसेल अशा वेळी काम सुरू करण्यास फर्माविता येईल. मात्र त्यास [३][रात्री ००-३० वाजल्यानंतर] काम करण्यास फर्मावता येणार नाही :

---

[१] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ८ (२) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ८ (३) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[३] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६४ याच्या कलम ६ (१) (ब) द्वारे आकडे व अक्षरे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आली.

आणखी असे की, असे आहारगृह किंवा खाद्यगृह बंद करण्याचे वेळी जर कोणत्याही गिऱ्हाईकास सेवा इत्यादी पुरवण्यात येत असतील किंवा ते त्यासाठी थांबले असेल तर, अशा वेळेच्या लगतनंतरच्या पाव तासाच्या आत त्यास सेवा पुरवता येतील.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींच्या अधीनतेने [१][राज्य] शासनास निरनिराळ्या आहारगृहांसाठी किंवा खाद्यगृहांसाठी अथवा निरनिराळ्या क्षेत्रांसाठी अथवा वर्षातील निरनिराळ्या कालावधींसाठी आहारगृह किंवा खाद्यगृह उघडण्याच्या त्याहून नंतरच्या वेळा किंवा बंद करण्याच्या त्याहून लवकरच्या वेळा निश्चित करता येतील.

(३) या कलमात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर अधिनियमितीत काहीही असले तरी, वर्षातून १० पेक्षा अधिक नसतील इतके दिवस, उत्सवाच्या प्रसंगी किंवा विशेष प्रसंगी [१][राज्य] शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेगवेगळ्या आहारगृहांसाठी किंवा खाद्यगृहांसाठी किंवा वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी ती उघडण्याकरिता किंवा बंद करण्याकरता त्यास योग्य वाटतील अशा वेळा निश्चित करता येतील.

दुकानात विकला जातो अशा प्रकारचा माल दुकाने उघडण्याच्या वेळेपूर्वी किंवा ती बंद करण्याच्या वेळेनंतर आहारगृहे व खाद्यगृहे यात न विकणे.

**२०.** कलम १० व ११ खाली दुकाने उघडण्याकरिता निश्चित केलेल्या वेळेपूर्वी किंवा बंद करण्याकरिता निश्चित केलेल्या वेळेनंतर, अशा दुकानात ज्या प्रकारचा माल विकण्यात येत असेल त्या प्रकारचा माल कोणत्याही आहारगृहात किंवा खाद्यगृहात तिथल्या तिथेच सेवन करण्यासाठी असेल तेवढे सोडून एरवी विकला जाणार नाही.

निवासी हॉटेले, आहारगृहे व खाद्यगृहे यातील रोजचे [२][व आठवड्याचे] कामाचे तास]

**२१.** (१) [३][या अधिनियमांच्या इतर तरतुदींच्या अधिनतेने] कोणत्याही कर्मचाऱ्यांस कोणत्याही निवासी हॉटेलात, आहारगृहात किंवा खाद्यगृहात कोणत्याही दिवशी नऊ तासांपेक्षा [४][आणि कोणत्याही एका आठवड्यात ४८ तासांपेक्षा] अधिक वेळ काम करण्यास लावले जाणार नाही किंवा काम करण्याची मुभा दिली जाणार नाही.

(२) कलम १९, पोट-कलम (३) खाली अधिसूचित केलेल्या दिवशी कोणत्याही निवासी हॉटेलात, आहारगृहात किंवा खाद्यगृहात कोणत्याही कर्मचाऱ्यास पोट-कलम (१) खाली निश्चित केलेल्या कालावधीपेक्षा अधिक कालावधीपर्यंत काम करण्यास भाग पाडता येईल किंवा असे काम करण्याची मुभा देता येईल, मात्र असा कालावधी कोणत्याही दिवशी तीन तासांपेक्षा अधिक असता कामा नये.

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रान्तिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६४ च्या कलम ७-(अ) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ७(अ) (एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ७(अ) (दोन) अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

विश्रांतीसाठी मध्यंतर. [1][२२. निवासी हॉटेल, आहारगृह किंवा खाद्यगृह यातील कर्मचाऱ्यांचा प्रत्येक दिवसाचा कामाचा कालावधी अशा रीतीने ठरविण्यात आला पाहिजे की, खंड न पडता काम करण्याचा कोणताही कालावधी पाच तासांपेक्षा अधिक असणार नाही आणि कोणत्याही कर्मचाऱ्यास निदान एक तास विश्रांतीसाठी मध्यंतर दिल्याखेरीज पाच तासांपेक्षा अधिक कालावधीसाठी काम करण्यास फर्माविण्यात येणार नाही किंवा तशी मुभा देण्यात येणार नाही :]

[2][परंतु, [3][त्याबाबत जेथे अधिसंघ असेल तेथे त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली मान्यताप्राप्त अधिसंघाने किंवा जेथे असा अधिसंघ नसेल तेथे संबंधित बहुसंख्य कर्मचाऱ्यांनी अर्ज केल्यावरून] असे विश्रांतीसाठीचे मध्यंतर अर्ध्या तासापर्यंत कमी करता येईल.]

कामाचे कार्यकाल-योजन. **२३.** निवासी हॉटेल, आहारगृह किंवा खाद्यगृह यांतील कर्मचाऱ्याचे कार्यकालयोजन [4][बारा] तासांपेक्षा अधिक असणार नाही.

परंतु, [5][राज्य] शासनास कलम १९, पोट-कलम (३) खाली अधिसूचित करता येतील अशा दिवशी, ते ज्या शर्ती घालील, त्या शर्तीस अधीन राहून कामाच्या कार्यकालयोजनात वाढ करता येईल.

आठवडी सुट्या. **२४.** (१) निवासी हॉटेल, आहारगृह किंवा खाद्यगृह यांतील प्रत्येक कर्मचाऱ्यास आठवड्यातून निदान एक दिवस सुटी देण्यात येईल :

परंतु, ज्या कोणत्याही कर्मचाऱ्याचा कामावर असण्याचा एकूण कालावधी कोणत्याही आठवड्यात सहा दिवसांपेक्षा कमी असेल त्याच्या बाबतीत या पोट-कलमातील कोणत्याही तरतुदी लागू होणार नाहीत.

(२) नोकरास, ज्या दिवशी सुटी असेल त्या दिवशी मालकाने त्यास आपल्या हॉटेलच्या, आहारगृहाच्या किंवा खाद्यगृहाच्या धंद्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही कामासाठी आपल्या हॉटेलात, आहारगृहात किंवा खाद्यगृहात किंवा कोणत्याही इतर जागी बोलावणे किंवा नोकराने अशा दिवशी, अशा कामासाठी अशा हॉटेलात, आहारगृहात किंवा खाद्यगृहात किंवा इतर जागी जाणे हे विधिसंमत असणार नाही.

(३) निवासी हॉटेल, आहारगृह किंवा खाद्यगृह यातील कोणत्याही कर्मचाऱ्याच्या वेतनातून पोट-कलम (१) खाली त्यास दिलेल्या कोणत्याही सुटीच्या दिवसाबद्दल कोणतीही रक्कम कापून घेता येणार नाही. असा कर्मचारी रोजंदारीवर कामावर ठेवण्यात आला असला तरीही त्यास सुटीच्या दिवसाबद्दल त्याची रोजंदारी देण्यात येईल.

मालकाने कर्मचाऱ्यास ओळखपत्र पुरवणे. **२५.** निवासी हॉटेलातील, आहारगृहातील किंवा खाद्यगृहातील मालक कर्मचाऱ्यांस ओळखपत्र पुरवील, आणि निरीक्षकाने मागणी केली असता कर्मचारी ते हजर करील. अशा ओळखपत्रात पुढे दिलेला व तसेच, विहित करण्यात येईल असा इतर तपशील असेल :--

(अ) मालकाचे नाव ;

---

[1] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ च्या कलम ९ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[2] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २६ याच्या कलम १० अन्वये हा मजकुर जादा दाखल करण्यात आला.

[3] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६४ याच्या कलम ८ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ९ अन्वये मूळ शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[5] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(ब) आस्थापनेचे नाव कोणतेही असल्यास, व डाक पत्ता ;

(क) कर्मचाऱ्याचे नाव व वय ;

(ड) कर्मचाऱ्याचे कामाचे तास व विश्रांतीसाठी मध्यंतर व सुटीचा दिवस ;

[1][(ई) मालकाची किंवा व्यवस्थापकाची सही (तारखेसह).]

## प्रकरण पाच

## नाट्यगृहे किंवा सार्वजनिक मनोरंजनाची अथवा करमणुकीची इतर ठिकाणे

**२६.** त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर अधिनियमितीत काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतेही नाट्यगृह किंवा सार्वजनिक मनोरंजनाचे अथवा करमणुकीचे इतर कोणतेही ठिकाण कोणत्याही दिवशी [2][रात्री साडेबारापेक्षा उशिरा] बंद केले जाणार नाही.

नाट्यगृहे किंवा सार्वजनिक मनोरंजनाची अथवा करमणुकीची इतर ठिकाणे बंद करण्याची वेळ.

**२७.** दुकानात ज्या प्रकारचा माल विकला जातो असा माल, कलम ११ खाली दुकाने बंद करण्याकरिता ठरवलेल्या वेळेनंतर कोणत्याही नाट्यगृहात किंवा सार्वजनिक मनोरंजनाच्या अथवा करमणुकीच्या इतर ठिकाणी तेथल्या तेथे सेवन करण्यासाठी असेल ते सोडून एरवी विकता येणार नाही.

नाट्यगृहात किंवा सार्वजनिक मनोरंजनाच्या अथवा करमणुकीच्या इतर ठिकाणी दुकानात विकला जातो अशा प्रकारचा माल दुकाने बंद करण्याच्या वेळेनंतर न विकणे.

---

[1] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ च्या कलम १० अन्वये खंड "ई" जादा दाखल करण्यात आला.

[2] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६४ याच्या कलम १० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

नाट्यगृहे किंवा सार्वजनिक मनोरंजनाची अथवा करमणुकीची इतर ठिकाणे यातील रोजचे [५][व आठवड्याचे] कामाचे तास.

[१][२][२८. (१) कोणत्याही कर्मचाऱ्यास कोणत्याही नाट्यगृहात किंवा सार्वजनिक मनोरंजनाच्या अथवा करमणुकीच्या इतर ठिकाणी कोणत्याही दिवशी नऊ तासांपेक्षा [३][आणि कोणत्याही आठवड्यात अठ्ठेचाळीस तासांपेक्षा] अधिक वेळ काम करण्यास फर्मावता येणार नाही, किंवा काम करण्याची मुभा देता येणार नाही.

(२) कोणत्याही कर्मचाऱ्यास कोणत्याही नाट्यगृहात किंवा सार्वजनिक मनोरंजनाच्या अथवा करमणुकीच्या इतर ठिकाणी पोट-कलम (१) खाली निश्चित केलेल्या कालावधीपेक्षा कोणत्याही अधिक कालावधीपर्यंत जर असा कालावधी कोणत्याही आठवड्यात सहा तासांपेक्षा अधिक नसेल तर काम करण्यास फर्मावता येईल किंवा काम करण्याची मुभा देता येईल.]

विश्रांतीसाठी मध्यंतर.

[४][२९. नाट्यगृहातील किंवा सार्वजनिक मनोरंजनाच्या अथवा करमणुकीच्या इतर ठिकाणातील कर्मचाऱ्यांच्या प्रत्येक दिवसाच्या कामाचा कालावधी अशा रीतीने निश्चित करला येईल की जेणेकरून अखंडित कामाचा कोणताही कालावधी पाच तासांपेक्षा अधिक असणार नाही आणि कोणत्याही कर्मचाऱ्यास विश्रांतीसाठी निदान एक तास मध्यंतर दिल्याखेरीज पाच तासांपेक्षा अधिक वेळपर्यंत काम करण्यास फर्मावता येणार नाही किंवा काम करण्याची मुभा देता येणार नाही :]

[५][परंतु, राज्य शासनास संबधित कर्मचाऱ्यांनी त्याबाबतीत अर्ज केल्यावर, विश्रांतीसाठी दिलेले मध्यंतर अर्ध्या तासापर्यंत कमी करण्याची परवानगी देता येईल.]

कार्यकाल-योजन.

**३०.** नाट्यगृहातील किंवा सार्वजनिक मनोरंजनाच्या अथवा करमणुकीच्या इतर ठिकाणातील कर्मचाऱ्यांच्या कामाचे कार्यकालयोजन कोणत्याही दिवाशी अकरा तासांपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु, [६][राज्य] शासनास, सर्वसाधारणपणे किंवा एखाद्या विशिष्ट नाट्यगृहाच्या किंवा सार्वजनिक मनोरंजनाच्या अथवा करमणुकीच्या इतर ठिकाणाच्याबाबतीत त्याने ज्या शर्ती लादल्या असतील त्या शर्तींना अधीन राहून कार्यकालयोजन कालावधी वाढविता येईल.

आठवड्यातील सुटीचे दिवस.

**३१.** (१) एखाद्या नाट्यगृहातील किंवा सार्वजनिक मनोरंजनाच्या अथवा करमणुकीच्या इतर ठिकाणातील प्रत्येक कर्मचाऱ्यास आठवड्यातून निदान एक सुटी देण्यात येईल :

परंतु, एखाद्या कर्मचाऱ्याचा कामावर असण्याचा एकूण कालावधी कोणत्याही आठवड्यात सहा तासांपेक्षा कमी असेल तर, त्याच्याबाबतीत या पोट-कलमातील कोणतीही गोष्ट त्याला लागू होणार नाही.

---

[१] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६४ याच्या कलम ११ अन्वये कलम २८ च्या समास टीपेत हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्र. २८ कलम ११ अन्वये मूळ कलम २८ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[३] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६४ याच्या कलम ११ अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

[४] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्र. २८ याच्या कलम १२ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम २९ दाखल करण्यात आले.

[५] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २८ याच्या कलम ११ अन्वये हे "परंतुक" जादा दाखल करण्यात आले.

[६] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

(२) कर्मचाऱ्यास ज्या दिवशी सुटी असेल त्या दिवशी मालकाने त्यास नाट्यगृहात किंवा सार्वजनिक मनोरंजनाच्या अथवा करमणुकीच्या इतर ठिकाणी चालणाऱ्या आपल्या धंद्याच्या संबंधात असलेल्या कोणत्याही कामासाठी आपल्या नाट्यगृहात किंवा सार्वजनिक मनोरंजनाच्या अथवा करमणुकीच्या इतर ठिकाणी किंवा कोणत्याही इतर जागी बोलावणे किंवा कर्मचाऱ्यांनी अशा दिवशी अशा कामासाठी अशा नाट्यगृहात किंवा सार्वजनिक मनोरंजनाच्या किंवा करमणुकीच्या इतर ठिकाणी किंवा अशा कोणत्याही जागी जाणे हे विधिसंमत असणार नाही.

(३) नाट्यगृहातील किंवा सार्वजनिक मनोरंजनाच्या किंवा करमणुकीच्या इतर स्थानातील कोणत्याही कर्मचाऱ्याच्या वेतनातून पोट-कलम (१) खाली त्यास दिलेल्या कोणत्याही सुटीच्या दिवसाबद्दल कोणतीही रक्कम कापून घेतली जाणार नाही. असा कर्मचारी रोजंदारीवर कामावर ठेवण्यात आला असला तरीही त्या सुटीच्या दिवसाबद्दल त्याला रोजंदारी देण्यात येईल.

## प्रकरण सहा

## बालके, अल्पवयीन व्यक्ती व स्त्रिया यांना कामावर लावणे

**३२.** कोणत्याही बालकास - मग तो मालकाच्या कुटुंबातील असला तरीही कर्मचारी म्हणून किंवा अन्य कोणत्याही नात्याने कोणत्याही आस्थापनेत काम करण्यास फर्मावण्यात येणार नाही किंवा त्यास काम करण्याची मुभा देण्यात येणार नाही. (कोणत्याही बालकाने कोणत्याही आस्थापनेत काम न करणे.)

[1][**३३.** (१) कोणतीही अल्पवयीन व्यक्ती किंवा स्त्री -- मग ती मालकाच्या कुटुंबातील असली तरीही तिला कोणत्याही आस्थापनेत सकाळी सहा वाजण्यापूर्वी कर्मचारी म्हणून किंवा अन्य कोणत्याही नात्याने काम करण्यास फर्मावण्यात येणार नाही किंवा काम करण्याची मुभा देण्यात येणार नाही. (अल्पवयीन व्यक्तींच्या व स्त्रियांच्या काम सुरू करण्याच्या व बंद करण्याच्या वेळा.)

(२) अशा कोणत्याही अल्पवयीन व्यक्तीस कोणत्याही आस्थापनेत संध्याकाळी ७ वाजल्यानंतर काम करण्यास फर्मावण्यात येणार नाही किंवा काम करण्याची मुभा देण्यात येणार नाही.

(३) अशा कोणत्याही स्त्रीस कोणत्याही आस्थापनेत रात्री साडेआठ वाजल्यानंतर काम करण्यास फर्माविण्यात येणार नाही किंवा काम करण्याची मुभा देण्यात येणार नाही.]

**३४.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी कोणत्याही अल्पवयीन व्यक्तीस कर्मचारी म्हणून किंवा अन्यथा कोणत्याही आस्थापनेत कोणत्याही दिवशी सहा तासांपेक्षा अधिक वेळ काम करण्यास फर्मावण्यात येणार नाही किंवा काम करण्याची मुभा देण्यात येणार नाही. (अल्पवयीन व्यक्तीचे रोजचे कामाचे तास.)

(२) अशा कोणत्याही अल्पवयीन व्यक्तीस कर्मचारी म्हणून किंवा अन्यथा कोणत्याही आस्थापनेत विश्रांतीसाठी तिला निदान अर्धा तास मध्यंतर दिल्याखेरीज कोणत्याही दिवशी तीन तासांपेक्षा अधिक वेळ काम करण्यास फर्मावण्यात येणार नाही किंवा काम करण्याची मुभा देण्यात येणार नाही.

---

[1] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६४ च्या कलम १२ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम ३३ दाखल करण्यात आले.

अल्पवयीन व्यक्तीस आणि स्त्रियांस धोक्याच्या कामावर ठेवण्यास मनाई.

[1][**३४-अ.** कोणत्याही आस्थापनेत काम करणाऱ्या कोणत्याही अल्पवयीन व्यक्तीस किंवा स्त्रियांस कर्मचारी म्हणून असो किंवा अन्यथा असो राज्य शासनाकडून **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जे काम जीवितास, आरोग्यास, किंवा नीतिमत्तेस धोका पोहोचणारे म्हणून जाहीर करण्यात आले असेल असे काम करण्यास फर्मावण्यात येणार नाही किंवा असे काम करण्याची मुभा देण्यात येणार नाही.]

## प्रकरण सात

## वेतनी रजा व वेतन देणे

रजा.

**३५.** [2][(१) (अ) खंड (ब) च्या तरतुदींच्या अधीनतेने कोणत्याही वर्षात तीन महिन्यांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी कामावर ठेवलेल्या प्रत्येक कर्मचाऱ्यास त्याने त्या वर्षात काम केलेल्या प्रत्येक साठ दिवसांसाठी लागोपाठ किंवा अन्यथा पाच दिवसांहून अधिक नसेल इतक्या कालावधीची रजा देण्यात येईल :

(ब) ज्याने एका वर्षात दोनशे चाळीस दिवसांपेक्षा कमी नाही इतके दिवस काम केले असेल अशा प्रत्येक कर्मचाऱ्यास [3][त्याच्या सेवेच्या प्रारंभाची तारीख विचारात न घेता] लागोपाठ किंवा अन्यथा एकवीस दिवसांपेक्षा कमी नाही इतक्या कालावधीची रजा देण्यात येईल :

परंतु, अशी रजा जास्तीत जास्त बेचाळीस दिवसांच्या कालावधीपर्यंत साचू देता येईल.

**स्पष्टीकरण.**--एखाद्या कर्मचाऱ्यास खंड (अ) आणि (ब) खाली दिलेल्या रजेत, कलम १८, पोट-कलम (१) खाली दुकान किंवा वाणिज्यिक आस्थापना ज्या दिवशी बंद राहील त्या दिवशी अथवा कलम २४, पोट-कलम (१) किंवा कलम ३१ खाली ज्या दिवशी रजा मिळण्याचा त्यास हक्क असेल अशा रजेच्या कालावधीत येणाऱ्या दिवसाचा किंवा दिवसांचा समावेश होतो.]

[4]* * * * * *

(२) पोट-कलम (१) [5][किंवा (१-अ)] खाली रजा मिळण्याचा हक्क असलेल्या कर्मचाऱ्यास रजा देण्यापूर्वी मालकाकडून नोकरीवरून काढून टाकण्यात आले असेल किंवा त्याने रजेसाठी अर्ज केला असता व ती नाकारण्यात आली असता रजा मिळण्यापूर्वी तो नोकरी सोडून गेला तर, मालक त्यास रजेच्या बाबतीत कलम ३६ खाली द्यावयाची रक्कम देईल.

(३) पोट-कलम (१) [5][किंवा (१-अ)] खाली रजा मिळण्याचा हक्क असलेल्या कर्मचाऱ्यास रजा नाकारण्यात आली तर, त्यास रजा नाकारल्यासंबंधी निरीक्षकास किंवा [6][राज्य] शासनाने याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही इतर अधिकाऱ्यास कळविता येईल. निरीक्षक अशी माहिती विहित करण्यात येईल अशा नमुन्यामध्ये

---

[1] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २६ च्या कलम १२ अन्वये कलम ३४-अ समाविष्ट करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १३ अन्वये पोट-कलम (१) बदली दाखल करण्यात आले.

[3] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ३ (अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ब) अन्वये हे पोट-कलम वगळण्यात आले.

[5] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २६ याच्या कलम १३ (२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[6] विधि अनुकूलन आदेश १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

ठेवलेल्या नोंदवहीत दाखल करील. [१][कर्मचारी अशा माहितीची एक प्रत त्याच्या मालकाला देखील पाठवील आणि त्यानंतर त्या कर्मचाऱ्याने न घेतलेली रजा कोणत्याही मर्यादेशिवाय पुढे जमेस धरण्याचा हक्क असेल.]

[२][(४) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी प्रत्येक कर्मचाऱ्यास, त्याच्या सेवेचा कालावधी कितीही असला तरी प्रत्येक वर्षी २६ जानेवारी [३][१ मे, १५ ऑगस्ट व २ ऑक्टोबर] रोजी जादा सुटी मिळण्याचा हक्क असेल. या दिवसाच्या सुटीबद्दल त्याला, अशी सक्तीची सुटी ज्या महिन्यात येत असेल त्या महिन्यात त्याला, जे वेतन (अतिकालीक भत्ता सोडून) मिळत असेल त्याच्या दैनिक सरासरीइतक्या दराने वेतन देण्यात येईल :

परंतु, मालकास कोणत्याही कर्मचाऱ्याला यांपैकी कोणत्याही किंवा या सर्व दिवशी आस्थापनेत काम करण्यास लावता येईल, मात्र अशा कामाबद्दल अशा कर्मचाऱ्यास दैनिक सरासरी वेतनाच्या दुप्पट रक्कम देण्यात आली पाहिजे. तसेच या सक्तीच्या सुटीच्या ऐवजी इतर कोणत्याही दिवशी रजा देण्यात आली पाहिजे अशी शर्त असेल.]

**३६.** प्रत्येक कर्मचाऱ्यास त्याने निकटपूर्वीच्या तीन महिन्यांत जितके दिवस प्रत्यक्ष काम केले असेल तितक्या दिवसांच्या त्याच्या वेतनाच्या दैनंदिन सरसरीइतक्या दराने, अतिकालिक कामाच्यासंबंधात त्यास जी कोणतीही कमाई होईल ती हिशोबात न धरता, त्याच्या रजेच्या कालावधीबद्दल वेतन देण्यात येईल. रजेच्या काळातील वेतन.

**३७.** कलम ३५ खाली ज्यास रजा देण्यात आली असेल अशा कर्मचाऱ्यास त्याची रजा सुरू होण्यापूर्वी अशा रजेच्या कालावधीबद्दल त्यास देय असलेल्या एकूण रकमेपैकी निम्मी रक्कम देण्यात येईल. पैसे केव्हा द्यावेत.

१९३६ चा ५. **३८.** (१) वेतन प्रदान अधिनियम, १९३६ ज्याचा यात यापुढे "उक्त अधिनियम" असा उल्लेख केला आहे, यात काहीही अंतर्भूत असले तरी [४][राज्य] शासनास **राजपत्रातील** अधि-सूचनेद्वारे, असा निदेश देता येईल की, उक्त अधिनियम हा पोट-कलम (२) च्या तरतुदींच्या अधीनतेने [५][अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा स्थानिक क्षेत्रांतील] ज्या आस्थापनांना किंवा आस्थापनांच्या कोणत्याही वर्गास अथवा सर्व कर्मचाऱ्यांस किंवा कर्मचाऱ्यांच्या ज्या कोणत्याही वर्गास हा अधिनियम त्यावेळी लागू असेल अशा सर्वांना तो लागू होईल. वेतन प्रदान अधिनियम लागू करणे व त्याची सुधारणा.

(२) उक्त अधिनियमाच्या तरतुदी पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही आस्थापनेस किंवा कोणत्याही कर्मचाऱ्यास लागू करण्यात आल्यावर या अधिनियमाखाली नेमलेल्या निरीक्षकास तो, उक्त अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी त्याच्या अधिकारितेच्या स्थानिक हद्दीत करण्यासाठी नेमलेला निरीक्षक आहे असे समजण्यात येईल.

---

[१] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६४ च्या कलम १३ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १३ (क) अन्वये पोट-कलम (४) जादा दाखल करण्यात आले.

[३] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ३ (क) अन्वये "१ मे व १५ ऑगस्ट" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] सन १९६४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८ याच्या कलम २ अनुसूचीअन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

सन १९२३ चा अधिनियम क्र. ८ हा आस्थापनेतील कर्मचाऱ्यांना लागू असणे.

[१][३८-अ. श्रमिक भरपाई अधिनियम, १९२३ याच्या तरतुदी आणि त्याखाली वेळोवेळी केलेले नियम हा अधिनियम ज्या आस्थापनेला लागू होत असेल त्या आस्थापनेतील कर्मचाऱ्यांना जणूकाही ते श्रमिक भरपाई अधिनियम, १९२३ च्या अर्थांतर्गत कर्मचारी असावेत त्याप्रमाणे योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.]

आस्थापनेला औद्योगिक सेवायोजन (स्थायी आदेश) अधिनियम लागू होणे.

[२][३८-ब. औद्योगिक सेवायोजन (स्थायी आदेश) अधिनियम, १९६४ [३][त्या कलमात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त" अधिनियम असा करण्यात आला आहे.)] हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्याच्या तरतूदी व त्याखाली वेळोवेळी केलेले नियम आणि स्थायी आदेश हे (आदर्श स्थायी आदेशांसह) [४][जेथे पन्नास किंवा त्याहून अधिक कर्मचाऱ्यांना नोकरीवर ठेवण्यात आलेले असेल व ज्यांना हा अधिनियम लागू असेल अशा सर्व आस्थापनांना] जणू काही त्या आस्थापना उक्त अधिनियमाच्या अर्थांतर्गत औद्योगिक आस्थापना असाव्यात त्याप्रमाणे योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.]

आस्थापनेतील स्त्री कर्मचाऱ्यांना प्रसूती लाभ अधिनियम लागू होणे.

[२][३८-क. प्रसूती लाभ अधिनियम, १९६१ (या कलमात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, उक्त अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदी किंवा त्या खाली केलेले नियम हे ज्या आस्थापनांना हा अधिनियम लागू होतो त्या सर्व किंवा कोणत्याही आस्थापनांमध्ये वेतनावर नोकरीस ठेवलेल्या स्त्रियांना लागू करावेत असा निदेश देता येईल. या प्रयोजनासाठी अशा स्त्री कर्मचारी उक्त अधिनियमाच्या अर्थांतर्गत स्त्रिया असल्याचे मानण्यात येईल. उक्त अधिनियमाच्या तरतुदी लागू केल्यानंतर या अधिनियमाखाली नेमलेला निरीक्षक हा त्याच्या अधिकारितेच्या मर्यादेमध्ये ही उक्त अधिनियमाच्या तरतुदीची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी देखील निरीक्षक असल्याचे मानण्यात येईल.]

## प्रकरण आठ

## आरोग्य व सुरक्षितता

स्वच्छता.

**३९.** प्रत्येक आस्थापनेची परिवास्तू स्वच्छ ठेवण्यात येईल. तसेच कोणतीही नाली, संडास किंवा इतर उपद्रव यातून उद्‌भवणाऱ्या गटार घाणीचा तिला उपसर्ग होणार नाही अशा रीतीने ती स्वच्छ ठेवण्यात येईल आणि ती, विहित करण्यात येईल अशा वेळी व अशा पद्धतीने साफ करण्यात येईल. या पद्धतीत चुना लावणे, रंग देणे, तलरंग लावणे, रोगजंतूरहित करणे, दुर्गंधीरहित करणे या गोष्टींचा समावेश करता येईल.

---

[१] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ च्या कलम १४ अन्वये कलम ३८-अ समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६४ च्या कलम १५ अन्वये कलमे ३८-ब व ३८-क समाविष्ट करण्यात आली.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १४ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ४ अन्वये "हा अधिनियम लागू असणाऱ्या सर्व आस्थापनांना" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**४०.** प्रत्येक आस्थापनेच्या परिवास्तूमध्ये विहित करण्यात येईल अशा प्रमाणानुसार व अशा पद्धतीनुसार वायुवीजन व्यवस्था करण्यात येईल. वायुवीजन.

**४१.** (१) प्रत्येक आस्थापनेच्या परिवास्तूत कामाच्या सर्व वेळेत दिवाबत्तीची व्यवस्था करण्यात येईल. दिवाबत्ती.

(२) आपल्या अधिकारितेतील कोणत्याही आस्थापनांच्या परिवास्तूत दिवाबत्तीची पुरेशी व्यवस्था करण्यात आलेली नाही असे निरीक्षकास दिसून आल्यास त्यास, मालकाबर लेखी आदेश बजावून त्याद्वारे त्याच्या मते ज्या उपाययोजना अंगीकरणे इष्ट असेल त्या विनिर्दिष्ट करण्यात येतील व अशा उपाययोजना विनिर्दिष्ट तारखेपूर्वी परत पाठवण्यास फर्मावता येईल.

**४२.** विहित करण्यात येईल अशा आस्थापना किंवा अशा वर्गातील आस्थापना सोडून एरवी प्रत्येक आस्थापनेत आगीच्या बाबतीत विहित करण्यात येतील अशा सावधगिरीच्या उपाययोजना करण्यात येतील. आगीच्या बाबतीत सावधगिरीची उपाययोजना.

१९४८ चा ६३. [1][**४२-अ.** कारखाना अधिनियम, १९४८, कलम २, खंड (के) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेली माल तयार करण्याची प्रक्रिया ज्यात केली जात असेल अशा प्रत्येक आस्थापनेत विहित करण्यात येतील अशा वस्तू असलेल्या प्रथमोपचाराच्या पेटीची तरतूद करण्यात येईल व ती सुस्थितीत ठेवण्यात येईल.] प्रथमोपचार.

## प्रकरण नऊ

## अंमलबजावणी आणि निरीक्षण

**४३.** या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल ती खेरीज करून एरवी आपल्या अधिकारितेखालील प्रदेशात या अधिनियमाची अंमलबजावणी करणे हे प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाचे कर्तव्य असेल. अशा अंमलबजावणीच्या बाबतीत विहित करण्यात येईल असे [2][राज्य] शासनाचे पर्यवेक्षण अशा प्राधिकरणावर राहील : स्थानिक प्राधिकरणाचे अधिकार व कर्तव्ये.

परंतु, स्थानिक प्राधिकरण आदेशाद्वारे असा निदेश देऊ शकेल की, वर सांगितल्याप्रमाणे या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याची कर्तव्ये आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा परिस्थितीत व आदेशांत ज्या कोणत्याही शर्ती विनिर्दिष्ट करण्यात येतील त्या शर्तींच्या अधीनतेने मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा त्याच्या अधीन असलेला कोणताही इतर अधिकारी पार पाडील.

तसेच कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकारितेखाली नसतील अशा प्रदेशाच्या बाबतीत उक्त तरतुदींची अंमलबजावणी करणे हे [2][राज्य] शासनाचे कर्तव्य असेल.

**४४.** या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याचा अधिकार कलम ४३ खाली ज्या स्थानिक प्राधिकरणास देण्यात आला असेल त्याला [2][राज्य] शासनाच्या पूर्वमंजुरीने या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याकरिता या अधिनियमाच्या किंवा [2][राज्य] शासनाने त्याखाली केलेल्या नियमांच्या किंवा दिलेल्या आदेशांच्या तरतुदींस विसंगत नसतील असे उपविधी करता येतील. उपविधी करण्याचा अधिकार.

---

[1] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १४ अन्वये कलम ४२-अ समाविष्ट करण्यात आले.

[2] विधि अनुकूलन आदेश, १९५० या अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

स्थानिक प्राधिकरणांकडून अधिनियमाचे प्रशासन हाती घेण्यासाठी तरतूद.

[१][४४अ. कलमे ४३ व ४४ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी राज्यातील सर्व स्थानिक प्राधिकरणांकडून या अधिनियमाचे प्रशासन हळूहळू स्वतःकडे घेण्याच्या राज्य शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने राज्य शासनास वेळोवेळी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणखी नोटीस किंवा कारण देण्याची गरज न पडता अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेले कोणतेही स्थानिक प्राधिकरण किंवा स्थानिक प्राधिकरणाचा वर्ग हा, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपासून या अधिनियमाच्या तरतूदींची अंमलबजावणी करण्याचे काम करणे बंद करील असे घोषित करता येईल. त्या तारखेपासून अशा स्थानिक प्राधिकरणांच्या अधिकारितेच्या अधीन असणाऱ्या क्षेत्रांच्या बाबतीत देखील उक्त तरतुदींची अंमलबजावणी करणे हे राज्य शासनाचे कर्तव्य असेल.]

अधिकारांचे प्रत्यायोजन.

[२][४५. राज्य शासनास या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमान्वये त्याला वापरण्यायोग्य असलेल्या कोणत्याही अधिकारांच्या (नियम करण्याचा अधिकार सोडून) आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा बाबींच्या संबंधात व अशा कोणत्याही शर्ती असल्यास त्यांच्या अधीनतेने विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे कोणत्याही स्थानिक प्राधिकरणास किंवा राज्य शासनाच्या अधीन असणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याससुद्धा वापर करता येईल असा निदेश राजपत्रातील आदेशान्वये देता येईल.

स्थानिक प्राधिकरणाने कर्तव्ये बजावण्यात कसूर केली असता ती पार पाडण्याबाबत तरतूद करण्याचा [३][राज्य] शासनाचा अधिकार.

**४६.** (१) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली सोपविण्यात आलेले कोणतेही कर्तव्य बजावण्यात कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने कसूर केली तर ते कर्तव्य बजावण्यासाठी राज्य शासनास एखाद्या व्यक्तीची नेमणूक करता येईल. तसेच ते असा निदेश देऊ शकेल की, ते कर्तव्य बजावण्यासाठी नेमलेल्या व्यक्तीस ते बजावण्याचा खर्च व वाजवी पारिश्रमिकसुद्धा स्थानिक प्राधिकरण ताबडतोब देईल.

(२) खर्च व पारिश्रमिक याप्रमाणे देण्यात न आल्यास, नगरपालिका निधी किंवा स्थानिक निधी यांच्यासंबंधातील कोणत्याही कायद्यात किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या बँकेत स्थानिक प्राधिकरणाचा कोणताही पैसा ठेव म्हणून ठेवण्यात आला असेल त्या बँकेत किंवा ज्या सरकारी स्थानिक कोषागारात किंवा ज्या कोणत्याही इतर सुरक्षित जागी स्थानिक प्राधिकरणाचा असा पैसा ठेव म्हणून ठेवण्यात आला असेल ते कोषागार किंवा ती सुरक्षित जागा यांच्या प्रभारी व्यक्तीस स्थानिक प्राधिकरणाच्या खाती अशा बँकेत जमा असलेल्या किंवा अशा व्यक्तीच्या हाती असलेल्या पैशातून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून अथवा त्याच्यावतीने अशा बँकेकडे किंवा व्यक्तीकडे ठेव म्हणून ठेवण्यासाठी वेळोवेळी आलेल्या पैशातून असा खर्च व पारिश्रमिक देण्याचा आदेश [३][राज्य] शासन देऊ शकेल आणि अशी बँक किंवा व्यक्ती असा आदेश पाळण्यास बद्ध असेल. अशा आदेशास अनुसरून कोणताही पैसा देण्यात आल्यास, अशा बँकेकडे किंवा व्यक्तीकडे याप्रमाणे ठेव म्हणून ठेवलेल्या स्थानिक प्राधिकरणाच्या सर्व पैशामधून त्याने याप्रमाणे दिलेल्या कोणत्याही रकमेच्या किंवा रकमांच्या संबंधात स्थानिक प्राधिकरणासंबंधात असलेल्या सर्व दायित्वातून अशी बँक किंवा व्यक्ती पुरेशी मुक्त झालेली असेल.

---

[१] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६४ च्या कलम १६ अन्वये कलम ४४-अ समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १७ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम ४५ समाविष्ट करण्यात आले.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० या अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

४७. कोणतीही नगरपालिका किंवा स्थानिक निधी यांच्या संबंधातील कोणत्याही अधिनियमितीत काहीही अंतर्भूत असले तरीही नगरपालिकेने किंवा स्थानिक मंडळाने या अधिनियमाखाली व या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता केलेले सर्व खर्च, यथास्थिति, नगरपालिका निधीतून किंवा स्थानिक निधीतून देण्यात येतील. स्थानिक प्राधिकरणाने केलेला खर्च त्याच्या अनुदानातून चुकता करणे.

४८. (१) प्रत्येक स्थानिक प्राधिकरण आपल्या अधिकारितेखालील क्षेत्रासाठी या अधिनियमाच्या तरतुदी पार पाडण्याकरिता त्यास योग्य वाटतील इतक्या विहित अर्हता असलेल्या व्यक्तींची निरीक्षक म्हणून नेमणूक करील. निरीक्षकांची नेमणूक.

(२) कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकारितेखाली नसलेल्या क्षेत्रात [१][राज्य] शासन विहित अर्हता असलेल्या निरीक्षकांची नेमणूक करील [२][आणि कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकारितेखाली असलेल्या क्षेत्रात राज्य शासन अशा पर्यवेक्षणासाठी ते विहित करील अशा अर्हता असणारे निरीक्षक नेमील.]

[३][(३) स्थानिक प्राधिकरण किंवा यथास्थिति राज्य शासन असा निदेश देऊ शकेल की, या कलमान्वये त्याला प्रदान करण्यात आलेले अधिकार निदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा परिस्थितीत आणि अशा शर्तीच्या (कोणताही असल्यास) अधीनतेने--

(अ) स्थानिक प्राधिकरणाच्याबाबतीत त्याच्या स्थायी समितीला किंवा त्याने याबाबत नेमलेल्या कोणत्याही इतर समितीला वापरता येतील किंवा असे स्थानिक प्राधिकरण म्हणजे महानगरपालिका असल्यास, महानगरपालिका आयुक्ताला किंवा महानगरपालिका उप-आयुक्ताला वापरता येतील, आणि.,

(ब) राज्य शासनाच्याबाबतीत त्याच्या अधीन असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला वापरता येतील.

१९४८ चा ११ (४) किमान वेतन अधिनियम, १९४८ यात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही क्षेत्राच्या-संबंधात या अधिनियमाखाली नेमण्यात आलेले निरीक्षक हे-मग ते स्थानिक प्राधिकरणाने नेमलेले असोत किंवा राज्य शासनाने नमलेले असोत-हा अधिनियम लागू असणाऱ्या आस्थापनांच्या संबंधात, किमान वेतन अधिनियम, १९४८ याच्या प्रयोजनांसाठी देखील निरीक्षक आहेत असे मानण्यात येईल आणि ज्या स्थानिक हद्दींच्या आत निरीक्षक त्या अधिनियमाखाली आपली कामे पार पाडील त्या स्थानिक हद्दी या ज्या क्षेत्रासाठी या अधिनियमाखाली त्यास नेमण्यात आले असेल त्याच असतील.]

४९. [१][राज्य] शासनाने याबाबत केलेल्या नियमांच्या अधीनतेने निरीक्षकास ज्या स्थानिक हद्दींकरीता त्यास नेमण्यात आले असेल त्या स्थानिक हद्दींच्या आत :-- निरीक्षकाचे अधिकार व कर्तव्ये

(अ) जी कोणतीही जागा आस्थापना म्हणून असेल किंवा तशी असल्याचे त्यास सकारण वाटत असेल त्या जागेत [४][शासनाच्या] किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतील त्यास योग्य वाटेल अशा ज्या कोणत्याही व्यक्तीस तो मदतनीस म्हणून घेईल त्यासह सर्व वाजवी वेळी प्रवेश करता येईल;

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १६ (ब) अन्वये पोट-कलमे (३) व (४) समाविष्ट करण्यात आली.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये क्राऊन "बादशहा" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(ब) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता उक्त परिवास्तू व विहित केलेल्या कोणत्याही नोंदवह्या, अभिलेख व नोटिसा यांची त्यास आवश्यक वाटेल अशी तपासणी करता येईल व तेथल्या तेथे किंवा अन्य प्रकारे कोणत्याही व्यक्तींकडून पुरावा घेता येईल.

[१][ * * * * ]

[२][(बब) ज्या आस्थापनेस हा अधिनियम लागू असेल अशा आस्थापनेच्या कोणत्याही मालकाने कलम ५२ किंवा ५५ खाली शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आहे असा त्यास सकारण संशय येत असेल तरी, विहित करण्यात येईल त्या प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेऊन त्यास आवश्यक वाटतील अशा उक्त मालकाच्या नोंदवह्या, अभिलेख किंवा इतर दस्तऐवज याचे अभिग्रहण करता येईल, आणि तो त्याबद्दल पावती देईल आणि ते त्यांच्या तपासणीसाठी किंवा खटल्यासाठी आवश्यक असतील तोपर्यंतच ठेवून घेता येतील आणि ;]

(क) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता त्यास आवश्यक वाटेल असे इतर अधिकार वापरता येतील :

परंतु, कोणत्याही व्यक्तीस, ज्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर दिल्याने किंवा जो कोणताही पुरावा दिल्याने तो स्वतः गुन्हेगार ठरण्याचा संभव असेल अशा प्रश्नाचे उत्तर देण्यास किंवा असा पुरावा देण्यास या कलमाखाली फर्मावले जाणार नाही.

निरीक्षक लोकसेवक असणे.

**५०.** कलम ४८ खाली प्रत्येक निरीक्षक हा भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक आहे असे मानले जाईल. १८६० चा ४५.

मालकाने [४][व व्यवस्थापकाने] नोंदवही, कांगदपत्रे वगैरे निरीक्षणासाठी हजर करणे.

**५१.** प्रत्येक मालकाने [३][व त्याच्या गैरहजेरीत व्यवस्थापकांने] या अधिनियमाखाली व त्याच्या प्रयोजनाकरिता ठेवणे आवश्यक असलेल्या सर्व नोंदवह्या, अभिलेख व नोटिसा निरीक्षकाने निरीक्षण करण्यासाठी मागणी केली असता हजर केल्या पाहिजेत.

## प्रकरण दहा
## अपराध व शास्त्री

विवक्षित तरतुदींचे उल्लंघन व अपराध

**५२.** (अ) कोणताही मालक, निरीक्षकास कलम ७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत विवरणपत्र पाठवण्यात किंवा कलम ८ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत फेरफाराची नोटीस देण्यात किंवा कलम ९ खाली त्याने आस्थापना बंद केल्याचे कळवण्यात कसूर करील तर; अथवा

---

[१] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम १७ (१) अन्वये "आणि" हे शब्द वगळण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १७ (२) अन्वये खंड (बब) जादा दाखल करण्यात आला.

[३] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ च्या कलम १५ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १५ (२) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

(ब) कोणत्याही आस्थापनेत कलमे १०, ११, १३, १८, १९, २०, २६, २७, ३९, ४०, ४१ किंवा ४२ यांच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही आदेशांचे उल्लंघन होईल तर; अथवा

(क) कोणत्याही आस्थापनेत कलमे १४, १५, १६, १७, २१, २२, २३, २४, २८, २९, ३० किंवा ३१ यांचे उल्लंघन करून कोणत्याही व्यक्तीस काम करण्यास लावण्यात किंवा काम करण्याची परवानगी देण्यात येईल तर; अथवा

(ड) कोणत्याही आस्थापनेत कलमे ३२, ३३ किंवा ३४ यांचे उल्लंघन करून मुलाला किंवा अल्पवयीन व्यक्तीला किंवा स्त्रीला काम करण्यास लावण्यात किंवा काम करण्याची परवानगी देण्यात येईल तर; अथवा

[१][(ई) कोणताही मालक किंवा व्यवस्थापक कलम ५१ च्या तरतुदीचे उल्लंघन करील किंवा कोणताही मालक कलम ६२ किंवा ६५ च्या तरतुदींचे उल्लंघन करील तर; अथवा]

(फ) कोणत्याही आस्थापनेत ज्याबाबत या अधिनियमात विनिर्दिष्ट शिक्षेची तरतूद करण्यात आलेली नसेल असे कोणत्याही कलमाचे, नियमाचे किंवा आदेशाचे उल्लंघन होईल तर;

मालक व व्यवस्थापक यापैकी प्रत्येकास सिध्दापराध ठरण्यात आले असता [२][प्रत्येक अपराधासाठी पन्नास रुपयांपेक्षा कमी नसेल व पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या] दंडाची शिक्षा होईल;

[३][परंतु, सिध्दापराध ठरवण्यात आल्यावर दहा दिवस संपल्यानंतर जर कलम ७, पोट-कलम १ च्या तरतुदींचे उल्लंघन चालू राहिले तर, मालकास सिध्दापराध ठरवण्यात आले असता याप्रमाणे उल्लंघन चालू राहील त्या प्रत्येक दिवसासाठी [४][वीस रुपयांपर्यंत] वाढवता येईल अशी आणखी दंडाची शिक्षा होईल].

**५३.** कोणत्याही व्यक्तीने कलम १२ च्या तरतुदींचे उल्लंघन केल्यास तिला सिध्दापराध ठरवण्यात आले असता [५][प्रत्येक अपराधासाठी [६][पन्नास रुपयांहून कमी नसेल व एक हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल] अशी शिक्षा होईल.]. कलम १२ चे उल्लंघन.

---

[१] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम १६ अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (ई) बदली दाखल करण्यात आला.

[२] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ५ अन्वये "पंचवीस रुपयांहून कमी नसेल व अडीचशे रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ यांच्या कलम १८ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[४] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ५ (ब) अन्वये "दहा रुपयांपर्यंत" या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६४ याच्या कलम १८ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ६ अन्वये "पंचवीस रुपयांहून कमी नसेल व एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

कलम १८ (२), २४, ३१ व ६५ यांचे उल्लंघन करणारे कर्मचारी.

**५४.** एखदा कर्मचारी कलम १८, पोट-कलम (२), कलमे २४, ३१, किंवा ६५ यांच्या तरतुदींचे उल्लंघन करील तर सिध्दापराध ठरवण्यात आले असता त्यास [१][प्रत्येक अपराधासाठी [२][पन्नास] रुपयांहून कमी नसेल व एक हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल] इतक्या दंडाची शिक्षा होईल.]

मालकाने व व्यवस्थाकाने केलेल्या खोट्या नोंदी.

**५५.** जर कोणताही मालक किंवा व्यवस्थापक या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींच्या अनुसार ठेवण्यासाठी विहित केलेल्या कोणत्याही नोंदवहीत, अभिलेखात किंवा नोटिशीत जी कोणतीही नोंद कोणत्याही महत्त्वाच्या तपशिलाच्या बाबतीत खोटी आहे असे त्यास माहीत असेल अशी नोंद फसविण्याच्या हेतूने करील, करवील किंवा करण्याची मुभा देईल किंवा कोणत्याही अशा नोंदवहीत, अभिलेखात किंवा नोटिशीत या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींखाली जी कोणतीही नोंद करणे आवश्यक असेल ती करण्याचे बुध्दि-पुरस्पर वगळील किंवा वगळण्यास लावील किंवा तशी मुभा देईल, किंवा कोणत्याही नोंदवहीचे, अभिलेखाचे किंवा नोटिशीचे अशा नोटिशीची कार्यालय प्रत खेरीज करून एकापेक्षा अधिक संच ठेवील किंवा ठेवण्याची व्यवस्था करील किंवा ठेवण्याची मुभा देईल किंवा या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींखाली पाठवण्यासाठी विहित केलेले कोणतेही विवरण, माहिती किंवा नोटीस कोणत्याही महत्त्वाच्या तपशीलाच्या बाबतीत खोटी आहे असे त्यास माहीत असून निरीक्षकाकडे पाठवील किंवा पाठविण्यास लावील किंवा पाठविण्याची मुभा देईल, तर त्यास, सिध्दापराध ठरवण्यात आले असता, [३][शंभर रुपयांहून कमी नसेल व पाचशे रुपयापेक्षा अधिक नसेल] इतक्या दंडाची शिक्षा होईल :

परंतु, मालक व व्यवस्थापक या दोघांसही सिध्दापराध ठरवण्यात आले तर, त्याच्या उल्लंघनाबद्दल द्यावयाच्या दंडाची एकूण रक्कम [४][पाचशे] रुपयांपेक्षा अधिक असणार नाही.

काही बाबतीत अगोदरच्या अपराध सिध्दीनंतर वाढवलेली शास्ती.

**५६.** कलम १० चे पोट-कलम (१), कलमे ११, १३, १४, १८, १९, २४, ३१ किंवा ३४ खाली कलम १४, पोट-कलम (२) किंवा (३) खाली किंवा कलम ५५ खाली किंवा कलमे २१, २६, २८, ३२, ३३, ५१, ५७, ६२ किंवा ६५ खाली कोणताही अपराध केल्याबद्दल ज्यास सिध्दापराध ठरवण्यात आले असेल असा कोणताही मालक व व्यवस्थापक हा त्याच तरतुदीचे उल्लंघन केल्यामुळे झालेल्या अपराधाबद्दल पुन्हा अपराधी असल्याचे आढळून आले तर, त्यापैकी प्रत्येकास दुसऱ्यांदा सिध्दापराध ठरवण्यात आले असता [५][शंभर रुपयांहून] कमी नसेल व [६][एक हजार रुपयांपेक्षा] जास्त नसेल इतक्या दंडाची शिक्षा होईल आणि ते

---

[१] सन १९७७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४ याच्या कलम १९ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ७ अन्वये "पंचवीस रुपयांहून कमी नसेल व एक हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ८ अन्वये "पन्नास रुपयांहून कमी नसेल व पाचशे रुपयांपेक्षा अधिक नसेल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ८ अन्वये "अडीचशे" या मजकुराऐवजी "पाचशे" हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ९ (एक) अन्वये "पन्नास रुपयांहून" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ९ (दोन) अन्वये "पाचशे रुपयांपेक्षा" या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

याप्रमाणे पुन्हा सिद्वापराध झाले असल्याचे आढळून आले तर, त्यापैकी प्रत्येकास तिसऱ्यांदा किंवा त्यानंतर पुन्हा केव्हाही सिद्वापराध ठरवण्यात आले असता [१][एकशे पन्नास रुपयांहून] कमी नसेल व [२][एक हजार पाचशे रुपयांहून] अधिक नसेल इतक्या रुपयांची दंडाची शिक्षा होईल:

परंतु मालक व व्यवस्थापक या दोघांस सिद्वापराध ठरण्यात आले तर, त्याच उल्लंघनाबद्दल द्यावयाच्या दंडाची एकून रक्कम दुसऱ्यांदा सिद्वापराध ठरवण्यात आले असता [३][एक हजार रुपयांपेक्षा] अधिक असणार नाही, आणि तिसऱ्यांदा किंवा त्यानंतर पुन्हा केव्हाही सिद्वापराध ठरवण्यात आले असता [३][एक हजार पाचशे रुपयांपेक्षा] जास्त असणार नाही अशी दंडाची शिक्षा होईल:

परंतु आणखी असे की, ज्या अपराधाबद्दल शिक्षा देण्यात येते तो अपराध घडल्यापासून दोन वर्षांहून अधिक कालावधीपूर्वी झालेल्या कोणत्याही अपराधसिद्वीची या कलमाच्या प्रयोजनाकरिता दखल घेतली जाणार नाही :

परंतु आणखी असे की, या कलमाखाली जो दंड लादणे आवश्यक असेल त्यापेक्षा कमी दंड करणे समर्थनीय ठरेल अशी अपवादात्मक परिस्थिती असल्याची न्यायालयाची खात्री झाली तर, त्याबाबतची कारणे लेखी नमूद करून न्यायालयास असा कमी दंड लादता येईल.

**निरीक्षकास अडथळे करण्याबद्दल शास्ती.**

**५७.** कलम ४९ खाली निरीक्षकास दिलेल्या कोणत्याही अधिकारांचा वापर करीत असताना जो कोणी त्यात बुध्दिपुरस्सर अडथळे निर्माण करील किंवा कोणत्याही कर्मचाऱ्यास त्याने निरीक्षकापुढे हजर होऊ नये म्हणून किंवा निरीक्षकाने त्याची तपासणी करू नये म्हणून लपवून ठेवील किंवा प्रतिबंध करील त्यास, सिध्दापराध ठरवण्यात आले असता [४][पन्नास रुपयांहून कमी नसेल व पाचशे रुपयापर्यंत वाढविता येईल] इतक्या दंडाची शिक्षा होईल.

**या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता मालक निर्धारित करणे.**

**५८.** (१) आस्थापनेचा मालक हा एखादी भागीदारी संस्था किंवा अन्य व्यक्ती अधिसंघ असेल तेव्हा भागीदार व्यक्तींपैकी किंवा सदस्य व्यक्तींपैकी कोणावरही अशा आस्थापनेचा मालक ज्या अपराधासाठी शिक्षेस पात्र होत असेल त्या अपराधाबद्दल या अधिनियमाखाली खटला भरता येईल व त्यास शिक्षा देता येईल :

परंतु, अशी भागीदारी संस्था किंवा अधिसंघ निरीक्षकाला अशी नोटीस देऊ शकेल की, आपण आपल्या सदस्यांपैकी [५][राज्यात] रहिवाशी असलेल्या एका सदस्यास या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता मालक म्हणून नेमले आहे, आणि अशी व्यक्ती असा रहिवाशी असेल तोपर्यंत, आणि त्याचे नामनिर्देशन रद्द झाल्याची पुढील नोटीस निरीक्षकास मिळेपर्यंत किंवा तो अशा भागीदारी संस्थेचा किंवा अधिसंघाचा भागीदार किंवा सदस्य असण्याचे बंद होईपर्यंत या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता मालक असल्याचे मानले जाईल.

(२) आस्थापनेचा मालक एखादी कंपनी असेल तेव्हा, तिच्या संचालकांपैकी कोणत्याही एका संचालकावर किंवा खाजगी कंपनीच्या बाबतीत तिच्या शेअरधारकांपैकी कोणाही एकावर आस्थापनेचा मालक ज्या अपराधाबद्दल शिक्षेस पात्र होत असेल अशा कोणत्याही अपराधाबद्दल या अधिनियमाखाली खटला भरता येईल व त्यास शिक्षा देता येईल:

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ९ (तीन) अन्वये "पंचाहत्तर रुपयांहून" या मजकुरा ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ९ (चार) अन्वये "सातशे पन्नास रुपयांपर्यंत" या मजकुरा ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ९ (दोन) अन्वये "पाचशे रुपयापेक्षा"या मजकुरा ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १० अन्वये"पंचवीस रुपयांहून कमी नसेल व अडीचशे रुपयांहून जास्त नसेल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतात" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

परतुं अशी कंपनी निरीक्षकाला अशी नोटीस देऊ शकेल की, आपण [१][राज्यात] रहिवासी असलेल्या तिच्या संचालकास किंवा खाजगी कंपनीच्याबाबतीत [१][राज्यात]रहिवासी असलेल्या तिच्या शेअरधारकास या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता आस्थापनेचा मालक म्हणून नामनिर्देशित केले आहे आणि असा संचालक किंवा शेअरधारक हा याप्रमाणे रहिवासी असेल तोपर्यंत आणि त्याची नेमणूक रद्द झाल्याची पुढील नोटीस निरीक्षकास मिळेपर्यंत किंवा तो संचालक किंवा शेअरधारक असण्याचे बंद होईपर्यंत या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता आस्थापनेचा मालक असल्याचे मानले जाईल.

विवक्षित प्रकरणांच्या बाबतीत मालकास किंवा व्यवस्थापकास दायित्व माफ करणे.

**५९.** (१) एखाद्या आस्थापनेच्या मालकावर किंवा व्यवस्थापकावर हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम किंवा दिलेले आदेश या विरूद्व अपराध केल्याबद्दल आरोप ठेवण्यात आला असेल तेव्हा त्यास, त्याने रीतसर तक्रार दाखल केल्यावर प्रत्यक्ष अपराधी म्हणून ज्या कोणत्याही दुसऱ्या व्यक्तीवर तो आरोप ठेवीत असेल त्या व्यक्तीस आरोपाची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या वेळेत न्यायालयापुढे हजर करविण्याचा हक्क असेल आणि अपराध घडल्याचे सिध्द झाल्यानंतर आस्थापनेचा मालक किंवा व्यवस्थापक, न्यायालयाचे समाधान होईल अशा रीतीने असे सिध्द करील की,--

(अ) अधिनियमाची अंमलबजावणी जारी करण्यासाठी योग्य ती दक्षता त्याने घेतली होती ; आणि

(ब) उक्त दुसऱ्या व्यक्तीने तो अपराध आपल्या नकळत किंवा आपल्या सहमतीवाचून किंवा मूक संमतीवाचून केला होता, तर, त्या दुसऱ्या व्यक्तीस त्या अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात येईल आणि तो जणूकाही मालक किंवा व्यवस्थापक असावा त्याप्रमाणे तशाच दंडाच्या शिक्षेस पात्र होईल, आणि मालकास किंवा व्यवस्थापकास या अधिनियमाखालील कोणत्याही जबाबदारीतून मुक्त करण्यात येईल.

(२) कार्यवाही दाखल करण्यापूर्वी निरीक्षकाची अशी खात्री करून देण्यात येईल की,--

(अ) आस्थापनेच्या मालकाने किंवा व्यवस्थापकाने या अधिनियमाची अंमलबजावणी जारी करण्यासाठी योग्य ती दक्षता घेतली होती ;

(ब) कोणत्या व्यक्तीने अपराध केला होता ; आणि

(क) तो अपराध मालकाच्या किंवा व्यवस्थापकाच्या नकळत किंवा सहमतीवाचून किंवा मूकसंमतीवाचून करण्यात आला, आणि तो आपण दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करून करण्यात आला होता ;

तर, निरीक्षक आस्थापनेच्या मालकाविरूध्द किंवा व्यवस्थापकाविरूध्द प्रथम कार्यवाही चालविण्यापूर्वी जी व्यक्ती प्रत्यक्ष अपराधी आहे असे त्यास वाटत असेल त्या व्यक्तीविरूध्द कार्यवाही चालवील आणि अशी व्यक्ती जणू ती मालक किंवा व्यवस्थापक असावी त्याप्रमाणे तशाच दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

अपराधांची दखल.

**६०.** हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम किंवा दिलेले आदेश याखालील कोणताही खटला हा निरीक्षक सोडून कोणत्याही व्यक्तीने दाखल करता कामा नये तसेच तो यथास्थिती [२][जिल्हा दंडाधिकाऱ्याची], [३][अपर जिल्हा दंडाधिकाऱ्यांची, उप विभागीय दंडाधिकाऱ्याची, कामगार आयुक्ताची, अपर कामगार आयुक्ताची किंवा कामगार उप आयुक्ताची] किंवा स्थानिक प्राधिकरणाची पूर्वमंजुरी घेतल्यावाचून

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२]सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ३, दुसरी अनुसूची अन्वये"राज्य शासनाच्या" याऐवजी हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६४ याच्या कलम २० (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१][किंवा व्यथित व्यक्तीने किंवा व्यथित व्यक्ती ज्या नोंदणीकृत संघटनेची सदस्य असेल त्या संघटनेच्या प्रतिनिधीने अशी कोणताही मंजूरी घेतल्यावाचून] दाखल करता कामा नये :

[२][परंतु कोणताही स्थानिक प्राधिकारी असा निदेश देऊ शकेल की, या पोट-कलमान्वये त्याला प्रदान करण्यात आलेले अधिकार, निदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या परिस्थितीत व ज्या कोणत्याही शर्ती त्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील त्या शर्तीच्या अधीनतेने स्थायी समितीला किंवा तिने याबाबत नेमलेल्या कोणत्याही समितीला किंवा असे स्थानिक प्राधिकरण महानगर पालिका असल्यास तिच्या महानगरपालिका आयुक्ताला, [३][महानगरपालिका उप आयुक्ताला किंवा महानगरपालिका सहाय्यक आयुक्ताला] वापरता येतील]

(२) [४][महानगर दंडाधिकारी किंवा न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग] याच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ असलेल्या कोणत्याही न्यायालयाला हा अधिनियम किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा दिलेला कोणताही आदेश याविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करता येणार नाही.

**६१.** [५][(१)] हा अधिनियम किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा दिलेला कोणताही आदेश या खालील कोणतीही [६][अभिकथित माहित निरीक्षकास मिळाल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत] त्याबद्दल तक्रार करण्यात आल्यावाचून कोणत्याही न्यायालयात अशा अपराधाची दखल घेण्यात येणार नाही. खटल्याची मुदत.

[७][(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी व्यथित व्यक्तीस किंवा व्यथित व्यक्ती ज्या नोंदणीकृत संघटनेची सदस्य असेल त्या संघटनेच्या प्रतिनिधिस अभिकथित अपराध ज्या तारखेस घडला असेल त्या तारखेपासून ३ महिन्यांच्या आत, अशा अपराधाची माहिती निरीक्षकास देता येईल व त्यास खटला दाखल करण्याची विनंती करता येईल. अशी माहिती मिळाल्यावर व विनंती करण्यात आल्यावर स्वतः निरीक्षकास पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदत मर्यादेच्या आत खटला दाखल करता येईल किंवा खटला दाखल करण्याची आपली इच्छा नाही असे तो अर्जदारास उक्त कालावधी संपण्यापूर्वी किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर कळवू शकेल. अशी माहिती मिळाल्यावर अर्जदारास खटला दाखल करण्याचा हक्क असेल व अर्जदाराने निरीक्षकाकडून माहिती मिळाल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत त्यासंबंधात न्यायालयाकडे तक्रार केली असेल तर न्यायालय अशा अपराधाची दखल घेईल.]

---

[१] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६४ याच्या कलम २० (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १७ अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम १९ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[४] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ११. अन्वये "इलाखा शहर दंडाधिकारी किंवा दुसऱ्या वर्गाचा दंडाधिकारी" या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६४ याच्या कलम २१ अन्वये कलम ६१ ला पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[६] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम १८ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६४ याच्या कलम २१ अन्वये पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.

## प्रकरण अकरा

### संकीर्ण व पूरक

नोंदवह्या व कागदपत्रे ठेवणे व नोटिसा लावणे.

**६२.** [१][राज्य] शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांच्या अधीनतेने मालक विहित करण्यात येतील अशा नोंदवह्या व अभिलेख ठेवील आणि विहित करण्यात येतील अशा नोटिसा आपल्या आस्थापनेच्या जागेत लावील.

जादा वेळ काम केल्याबद्दल वेतन.

**६३.** [२][हा अधिनियम लागू असेल अशा कोणत्याही आस्थापनेतील कर्मचाऱ्यास कामाच्या तासांच्या मर्यादेपेक्षा जादा वेळ काम करण्यास लावण्यात आले असेल त्याबाबत त्यास अतिकालिक कामाच्यासंबंधात त्याच्या नेहमीच्या वेतनाच्या दराच्या दुप्पट दराने वेतन मिळण्याचा हक्क असेल.]

**स्पष्टीकरण.**--कलमाच्या प्रयोजनाकरिता "कामाच्या तासाची मर्यादा" याचा अर्थ,

(अ) दुकाने व वाणिज्यिक आस्थापना येथील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, कोणत्याही दिवशी नऊ तास व कोणत्याही आठवड्यात ४८ तास असा आहे.

(ब) निवासी हॉटेले, आहारगृहे खाद्यगृहे, नाट्यगृहे किंवा सार्वजनिक मनोरंजनाच्या किंवा करमणुकीच्या बाबतीत कोणत्याही दिवशी ९ तास असा आहे, आणि

(क) इतर कोणत्याही आस्थापनेतील कर्मचाऱ्यांच्याबाबतीत विहित करण्यात येतील इतके तास असा आहे.

वयासंबंधी पुरावा.

**६४.** (१) एखादी व्यक्ती विवक्षित वयापेक्षा कमी वयाची किंवा अधिक वयाची असता एखादी कृती किंवा वर्जन हे अधिनियमाखालील शिक्षापात्र अपराध होत असेल आणि अशी व्यक्ती न्यायालयाच्या मते अशा वयापेक्षा कमी वयाची किंवा अधिक वयाची दिसत असेल तेव्हा, अशी व्यक्ती अशा वयापेक्षा कमी वयाची किंवा अधिक वयाची आहे हे सिद्ध करण्याचा भार अभिकथित व्यक्तीवर राहील.

(२) [३][अर्हता प्राप्त वैद्यक व्यवसायीने] एखाद्या कर्मचाऱ्याच्या संबंधात लेखी अभिकथन केलेले असेल व त्यात आपण त्या कर्मचाऱ्याची जातीने तपासणी केली आहे व तो अभिकथनात निर्दिष्ट केलेल्या वयापेक्षा कमी वयाचा किंवा अधिक वयाचा आहे असा आपणास विश्वास आहे असे नमूद केले असेल तर, असे अभिकथन अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता अशा कर्मचाऱ्याच्या वयासंबंधीचा पुरावा म्हणून ग्राह्य असेल.

**स्पष्टीकरण.**--या कलमाच्या प्रयोजनाकरिता [३][अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायी] या संज्ञेला कारखाना अधिनियम, [४][१९४८] यात अर्थ जो, असेल तोच अर्थ येथे असेल. १९४८ चा ६८.

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६४ याच्या कलम २२ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७ च्या कलम ३ अन्वये "नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी" या शब्दाऐवजी हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या वरील कलमान्वये "१९२४" याऐवजी हे आकडे दाखल करण्यात आले.

६५. ज्या दिवशी एखाद्या कर्मचाऱ्यास सुट्टी देण्यात आली असेल किंवा त्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार ज्या दिवशी तो रजेवर असेल त्या दिवशी त्याला कोणत्याही इतर आस्थापनेत काम करता येणार नाही किंवा कोणत्याही मालकाला त्यास अशा रीतीने काम करण्याची जाणूनबुजून परवानगी देता येणार नाही. सुट्टीच्या दिवशी किंवा रजेच्या अवधीत दुहेरी नोकरी करण्यावर निर्बंध.

६६. कोणताही मालक [१][जो कर्मचारी,---- [२][सेवा-समाप्तीची नोटीस.]

(अ) एका वर्षाहून कमी नसेल इतक्या कालावधीपर्यंत त्याच्या अखंडित सेवेत असेल, त्यास निदान ३० दिवसाची लेखी नोटीस किंवा अशा नोटिशीऐवजी वेतन दिल्याखेरीज सेवेतून काढून टाकणार नाही.

(ब) एका वर्षाहून कमी परंतु ३ महिन्यांपेक्षा अधिक कालावधीपर्यंत ज्याची अंखडित सेवा असेल त्यास निदान १४ दिवसांची लेखी नोटीस किंवा अशा नोटिशीऐवजी वेतन दिल्याखेरीज सेवेतून काढणार नाही ] :

परंतु ज्या कर्मचाऱ्यास गैरवर्तणुकीबद्दल सेवेतून काढून टाकले असेल त्याच्याबाबतीत अशा नोटिशीची आवश्यकता असणार नाही.

[३][**स्पष्टीकरण.---** या कलमाच्या प्रयोजनाकरिता "गैरवर्तणूक" या संज्ञेत पुढील गोष्टींचा समावेश असेल---

(अ) लेखी नोटीस दिल्याखेरीज किंवा पुरेशा कारणाखेरीज ७ किंवा त्यापेक्षा अधिक दिवस कामावर गैरहजर राहणे ;

(ब) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याचे उल्लंघन करून संपावर जाणे, किंवा संपास अपप्रेरणा देणे ; आणि

(क) आपल्या मालकाच्या मालमत्तेचे नुकसान करणे.]

६७. (१) [४][राज्य] शासनास या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता नियम करता येतील. नियम.

(२) विशेष करून व पूर्वगामी तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता असे नियम पुढील सर्व किंवा कोणत्याही गोष्टींसाठी करता येतील :--

(अ) कलम २, खंड (२१) खाली विहित प्राधिकाऱ्याची नेमणूक करणे ;

(ब) कलम ६ खाली या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी ज्या कालावधीपर्यंत, ज्या शर्तींच्या अधीनतेने व सुट्टीच्या ज्या दिवशी ज्या प्रसंगी तहकूब करता येईल तो कालावधी, त्या शर्ती, ते सुट्टीचे दिवस व ते प्रसंग ;

---

[१] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २६ याच्या कलम २० (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २० (२) अन्वये ही समास टीप बदली दाखल करण्यात आली.

[३] १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ यांच्या कलम १९ अन्वये हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

[४] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(क) कलम ७, पोट-कलम (१) खाली पाठवावयाच्या विवरणाचा नमुना, फी, व नमूद करावयाचा इतर तपशील, पोट-कलम (२) खाली आस्थापनेची नोंदणी ज्या रीतीने करावयाची ती रीत व प्रमाणपत्राचा नमुना, आणि कलम ८ खाली फेरफाराविषयी [१][नोटीस ज्या नमुन्यात व ज्या कालावधीत अधिसूचित केली जाईल तो नमुना व तो कालावधी] व जी फी देण्यात येईल ती फी ;

(ड) कलम १४, पोट-कलम (३) खाली अतिकालिक कामासाठी वर्षातील ६ दिवस निश्चित करणे ;

(ई) कलम १९, पोट-कलम (३) खाली अतिकालिक कामासाठी वर्षातील १० दिवस निश्चित करणे ;

(फ) कलम २५ खाली ओळखपत्रासाठी विहित करावयाचा आणखी तपशील ;

[२][ * * * * ]

(ह) कलम ६९ खाली आस्थापना ज्यावेळी व ज्या पध्दतीने साफ करण्यात येतील त्या पध्दती ठरवणे ; कलम ४० अन्वये ज्या प्रमाणात व पध्दतीस अनुसरून हवा खेळती राहील अशी सोय केली पाहिजे ती प्रमाणे व त्या पध्दती ठरवणे, आणि कलम ४२ च्या तरतुदींचा कक्षेतून ज्या आस्थापनांना माफी द्यावयाची त्या आस्थापना व उक्त कलमाखाली आगीच्याबाबतीत योजण्यात येतील ते सावधगिरीचे उपाय विहित करणे ;

[३][(ह-अ)] कलम ४२ अ खाली ठेवलेल्या प्रथमोपचार पेटीत असणाऱ्या वस्तू ].

(आय) कलम ४३ खाली [४][राज्य] शासन स्थानिक प्राधिकरणावर जे पर्यवेक्षण ठेवील ते पर्यवेक्षण ;

(ज) कलम ४८ खाली नेमलेल्या निरीक्षकांच्या अर्हता व कलम ४९ खाली विहित करावयाचे त्याचे अधिकार व कर्तव्ये ;

(के) कलम ६२ खाली ठेवावयाच्या नोंदवह्या व अभिलेख व प्रदर्शित करावयाच्या नोटिसा ;

(ल) कलम ६३ च्या स्पष्टीकरणाच्या खंड (क) खाली विहित करावयाच्या कामांच्या तासांची मर्यादा ;

(म) विहित केलेली किंवा करता येईल अशी कोणतीही इतर बाब.

(३) या अधिनियमाखाली केलेले नियम, ते आगाऊ प्रसिध्द करण्याच्या शर्तीच्या अधीन असतील आणि ते याप्रमाणे करण्यात येतील तेव्हा, या अधिनियमाचा भाग असल्याचे मानण्यात येईल.

[५][(४) या अधिनिमाखाली केलेले सर्व नियम ते केल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधीमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येतील आणि याप्रमाणे ते ज्या अधिवेशनात ठेवण्यात आले असतील त्या अधिवेशनात किंवा त्याच्या लगतनंतरच्या अधिवेशनात राज्य विधिमंडळ त्यात जे फेरफार करील व राजपत्रात प्रसिध्द करील, त्या फेरफारांस अधीन असतील. ]

---

[१]सन १९६२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम २० (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२]सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम २१ (अ) अन्वये खंड (ग) वगळण्यात आला.

[३]१९५२ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २८ याच्या कलम २० (२) अन्वये खंड (हअ) समाविष्ट करण्यात आला.

[४]विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[५]सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २६, कलम २१ (ब) अन्वये पोट-कलम (४) समाविष्ट करण्यात आला.

६८. या अधिनियमाखाली सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा ती करण्याचा इरादा असेल, अशा कोणत्याही कृतीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरूध्द कोणताही दावा, खटला, किंवा इतर कायदेविषयक कार्यवाही केली जाणार नाही. या अधिनियमाखाली कृती करणाऱ्या व्यक्तीस संरक्षण.

६९. कोणत्याही आस्थापनेस लागू असलेला कोणताही इतर कायदा, करार, रुढी किंवा परिपाठ यांखाली किंवा अशा आस्थापनेचा मालक व कर्मचारी यास बंधनकारक असलेला कोणताही निवाडा मिटवणूक किंवा करार याखाली या आस्थापनेतील कर्मचाऱ्यास हा अधिनियम अंमलात येण्याच्या तारखेस जे कोणतेही अधिकार किंवा विशेषाधिकार उपभोगण्याचा हक्क कसेल ते अधिकार किंवा विशेषाधिकार हे या अधिनियमान्वये त्यास उपभोगता येतील व त्यापेक्षा अधिक फायदेशीर असतील तर, त्यास या अधिनियमातील कोणत्याही तरतुदींमुळे बाध येणार नाही. इतर कायद्यांखाली असलेले अधिकार व विशेषाधिकार यांस बाध न येणे.

१९४८ चा ६३ ७०. [1][या अधिनियमातील कोणताही मजकूर [2][कारखाना अधिनियम, १९४८ याच्या तरतुदी ज्या कारखान्याला लागू होतात त्या ] कारखान्यास लागू होतो असे मानले जाणार नाही ; कारखान्यांत नोकरीला असलेल्या व्यक्तींना कारखाना अधिनियम लागू असणे व हा अधिनियम लागू नसणे.

परंतु, कारखान्याच्या आवारात असलेल्या कोणत्याही दुकानाचा किंवा व्यापारी आस्थापनेचा कारखान्याच्या उत्पादन प्रक्रियेशी संबंध नसेल त्याबाबतीत, त्यास या अधिनियमाच्या तरतुदी लागू होतील :

आणखी असे की, राज्य शासनाला राजपत्रातील अधिसूचनेव्दारे, कारखाना अधिनियम, १९४८ याच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदी कारखान्याच्या आवाराच्या आत असलेल्या कोणत्याही दुकानास किंवा वाणिज्यिक आस्थापनेस लागू करता येतील, आणि अशा दुकानास किंवा व्यापारी आस्थापनेस तो अधिनियम लागू केल्यावर, या अधिनियमाच्या तरतुदी त्यास लागू असण्याचे बंद होईल. ]

७१. वर्ष संपल्यानंतर [3][दोन महिन्यांच्या] आत अशा वर्षात आपल्या अधिकारितेखालील स्थानिक प्रदेशात झालेल्या या अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या संबंधीचा अहवाल [4][कामगार आयुक्त, मुंबई यास] सादर करणे हे प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाचे कर्तव्य असेल, तसेच तो आवश्यक असतील अशी वार्षिक किंवा नियतकालिक विवरणे [4][कामगार आयुक्त, मुंबई यास] वेळोवेळी सादर करील. वार्षिक अहवाल इत्यादी सादर करणे.

---

[1] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २६ याच्या कलम २२ अन्वये कलम ७० बदली दाखल करण्यात आले.

[2] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनिय क्रमांक ३५ याच्या कलम १२ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आली.

[3] १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ यांच्या कलम २३ (अ) अन्वये "३ महिन्याच्या" याऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[4] वरील अधिनियमाच्या कलम २३ ( ब ) अन्वये " राज्य शासनाला " याऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

मुंबई, दुकाने व आस्थापना अधिनियम, निरसित करणे

७२. या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस व त्या तारखेपासून मुंबई दुकाने व आस्थापना, अधिनियम, १९३९ हा निरसित करण्यात येईल : १९३९ चा मुंबई २४.

परंतु---

(अ) याप्रमाणे निरसित केलेल्या अधिनियमाच्या तरतुदीखाली केलेला, काढलेला किंवा दिलेला प्रत्येक नेमणूक आदेश, नियम, उपविधी, विनियम, अधिसूचना किंवा नोटीस ही ती या अधिनियमाखाली केलेला, काढलेला किंवा दिलेला कोणताही नेमणूक, आदेश, नियम, उपविधी विनियम, अधिसूचना किंवा नोटीस याअन्वये अधिक्रांत झालेली नसेल तर व होईतोपर्यंत याअधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर या अधिनियमाच्या तरतुदींखाली करण्यात, काढण्यात किंवा देण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

(ब) याप्रमाणे निरसित केलेल्या अधिनियमाच्य तरतुदींअन्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाच्या संपरीक्षेच्या संबंधात चालू असलेली कोणतीही कार्यवाही हीं जणूकाही उक्त अधिनियम निरसित करण्यात आलेला नसावा व तो प्रवर्तनात असण्याचे पुढे चालू असावे त्याप्रमाणे पुढे चालविण्यात व पूर्ण करण्यात येईल, आणि अशा कार्यवाहीत जो कोणताही दंड लावण्यात येईल तो याप्रमाणे निरसित केलेल्या अधिनियमाखाली वसूल केला जाईल.

## अनुसूची एक

**[कलम १(३)]**

**स्थानिक क्षेत्रे**

[१][१. बृहन्मुंबई].

[२][ * * * * ]

३. पुणे शहर व उपनगर नगरपालिका बरो.

४. पुणे कटक

५. सोलापूर नगरपालिका बरो.

६. बार्शी नगरपालिका बरो.

७. नासिक नगरपालिका बरो.

[२][ * * * * ]

[२][ * * * * ]

१०. कल्याण नगरपालिका क्षेत्र.

---

[१] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ९ व सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ अन्वये मूळ बाबींऐवजी ही बाब दाखल करण्यात आली.

[२] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये नोंद क्रमांक २, ८, ९ वगळण्यात आल्या.

[१][ *    *    *    *]

[१][ *    *    *    *]

[१][ *    *    *    *]

१४. पनवेल नगरपालिका क्षेत्र.

[१][ *    *    *    *]

[२][ *    *    *    *]

१७. मालेगाव नगरपालिका क्षेत्र.

१८. धुळे नगरपालिका क्षेत्र.

१९. ठाणे नगरपालिका बरो.

[२][ *    *    *    *]

२१. बारामती नगरपालिका क्षेत्र.

[२][ *    *    *    *]

२३. अंमळनेर नगरपालिका बरो.

२४. येवले नगरपालिका क्षेत्र.

[२][ *    *    *    *]

२६. पंढरपूर नगरपालिका बरो.

२७. भुसावळ नगरपालिका बरो.

२८. जळगाव नगरपालिका बरो.

२९. सातारा नगरपालिका बरो.

३०. रत्नागिरी नगरपालिका क्षेत्र.

३१. अहमदनगर नगरपालिका बरो.

३२. चाळीसगाव नगरपालिका बरो.

---

[१] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७ याचे कलम ९ व सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ अन्वये बाब क्रमांक ११, १२, १३ व १५ वगळण्यात आल्या.

[२] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये नोंद क्रमांक १६, २०, २२, २५ वगळण्यात आल्या.

[१][ * * * *]

[१][ * * * *].

[१][ * * * *]

३६. महाड नगरपालिका क्षेत्र.

[२][ * * * *]

३८. उरण नगरपालिका क्षेत्र.

[२][ * * * *]

[१][ * * * *]

[१][ * * * *]

४२. भिवंडी नगरपालिका क्षेत्र.

## [३][अनुसूची एक-अ

### [कलम २ खंड (१५) पहा]

(१) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ किंवा नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ खाली रचना केलेली महानगरपालिका. १८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ६१. १९५० चा म. प्र. अधि. २

(२) (अ) मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५ खाली रचना केलेली नगरपालिका. १९२५ चा मुंबई १८.

(ब) मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ खाली रचना केलेली नगरपालिका. १९०१ चा मुंबई ३.

(क) मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम, १९२२ खाली मागील शासकीय जनगणनेत ५५,००० किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या क्षेत्रासाठी रचना केलेली नगरपालिका. १९२२ चा म.प्र. व वऱ्हाड अधि. २.

(ड) हैदराबाद जिल्हा नगरपालिका अधिपिनयम, १९५६ अन्वये मागील शासकीय जनगणनेत ५०,००० किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या क्षेत्रासाठी रचना केलेली नगरपालिका. १९५६ चा हैदरा. १८.

(३) मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३ खाली रचना केलेले स्थानिक मंडळ किंवा हैदराबाद जिल्हा मंडळ अधिनियम, १९५५ खाली रचना केलेले जिल्हा मंडळ] १९२३ चा मुंबई ६. १९५६ चा हैदरा. १.

---

[१] मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ अन्वये नोंद क्रमांक ३३, ३४, ३५, ४० व ४१ वगळण्यात आल्या.

[२] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये नोंद क्रमांक ३७ व ३९ वगळण्यात आल्या.

[३] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २६ याच्या कलम २४ अन्वये अनुसूची एक-अ समाविष्ट करण्यात आली.

## अनुसूची-दोन

(कलम ४)

[१][खालील टिप्पणीच्या अधीनतेने] माफी

| अनुक्रमांक (१) | आस्थापना कर्मचारी किंवा इतर व्यक्ती (२) | अधिनियमाच्या तरतुदी (३) |
|---|---|---|
| १ | केंद्र सरकारच्या [२][आस्थापना] .. | सर्व तरतुदी |
| २ | [३][राज्य] शासनाच्या [२][आस्थापना] .. | वरीलप्रमाणे |
| ३ | स्थानिक प्राधिकरणांच्या [२][आस्थापना] | वरीलप्रमाणे |
| ४ | मुंबई बंदर विश्वस्त मंडळाच्या [२][आस्थापना] | वरीलप्रमाणे |
| ५ | कोणत्याही रेल्वे प्रशासनाच्या [२][आस्थापना] | वरीलप्रमाणे |
| ६ | मालाची जी विक्री धर्मादायार्थ किंवा इतर प्रयोजनासाठी करण्यात येते व जिच्यापासून कोणताही नफा मिळवण्यात येत नाही अशा मालाच्या विक्रीसाठी असलेले बाजार किंवा जत्रा. | वरीलप्रमाणे |
| [४][६अ. | भारतीय रिझर्व्ह बँकेची कार्यालये .. | वरीलप्रमाणे] |
| [५][६ब. | [६][व्यापार आयुक्त व वाणिज्यिक अधिकारी व विदेशी सरकारचे इतर राजनैतिक प्रतिनिधी यांची कार्यालये.] | वरीलप्रमाणे] |

[१] शासकीय अधिसूचना, कामगार विभाग, क्रमांक ८/४८-एक, दिनांक २८ एप्रिल १९४९ अन्वये हे शब्द व कंस जादा दाखल करण्यात आले.

[२] शासकीय अधिसूचना, कामगार विभाग, क्रमांक ८/४८, दिनांक २४ ऑगस्ट १९४९ अन्वये "कार्यालये" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] शासकीय अधिसूचना, कामगार विभाग, क्रमांक १८४/४७, दिनांक ४ फेब्रुवारी १९४९ अन्वये ही नोंद जादा दाखल करण्यात आली.

[५] शासकीय अधिसूचना, कामगार विभाग, क्रमांक १८४/४८ दिनांक २६ फेब्रुवारी १९४९ अन्वये ही नोंद जादा दाखल करण्यात आली.

[६] शासकीय अधिसूचना, कामगार विभाग, क्रमांक १८४/४८, दिनांक ११ एप्रिल १९४९ अन्वये "कॅनडासाठी असलेल्या वाणिज्यिक सचिवांचे कार्यालय" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| [१][६क. | विमान सेवा कंपनीची कार्यालये. .. | वरीलप्रमाणे] |
| | [२][* * * * *]. | |
| | [३][* * * * *] | |
| [४][६फ. | कोणत्याही प्रकारच्या शैक्षणिक कार्यांशी संबंधित असलेल्या आस्थापना.-- | सर्व तरतुदी] |
| | [५][जेथे एखाद्या व्यक्तीने किंवा परिसंस्थेने चालवलेले खास शिक्षण वर्ग, किंवा शिकवणी वर्ग चालवले जातात अशा, | |
| | परंतु-- | |
| | (१) कायद्याद्वारे स्थापन झालेल्या विद्यापीठाशी संलग्न असलेल्या आस्थापना, किंवा | |
| | (२) महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ खाली विभागीय मंडळाने मान्यता दिलेल्या आस्थापना, किंवा | |
| | (३) शिक्षण संचालनालय किंवा तंत्र शिक्षण संचालनालय, यांनी मान्यता दिलेल्या खाजगी, माध्यमिक किंवा तंत्र उच्च माध्यमिक शाळा, औद्योगिक प्रशिक्षण परिसंस्था, तंत्र निकेतन, अभियांत्रिकी महाविद्यालय किंवा शासनाने मान्यता दिलेले इतर पाठ्यक्रम चालवणाऱ्या परिसंस्था, | |
| | यांखेरीज अन्य आस्थापना खेरीज करून] | |

[१] शासकीय अधिसूचना, कामगार विभाग, क्रमांक ८/४८, दिनांक २८ एप्रिल १९४९ अन्वये मूळ नोंदी ऐवजी ही नोंद दाखल करण्यात आली.

[२] शासकीय पत्र, कामगार व समाज कल्याण विभाग, क्र. बीएसई/१४५८, दिनांक १६ फेब्रुवारी १९५९ अन्वये नोंद ६-ड वगळण्यात आली.

[३] शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्र. बीएसई/१४६१/एलअेबी-तीन, दिनांक ३१ डिसेंबर १९६२ अन्वये नोंद ६-ई वगळण्यात आली.

[४] शासकीय अधिसूचना, कामगार विभाग, क्रमांक ८/४८-एक, दिनांक २८ एप्रिल १९४९ अन्वये नोंद ६-फ जादा दाखल करण्यात आली.

[५] शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक बीएसई/१४७५/सीआर/८६५/एलअेबी-५, दिनांक ३० डिसेंबर १९७८ अन्वये नोंद क्रमांक ६-फ मध्ये हा भागांश जादा दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| [१][६ग. | उच्च न्यायालय विधि ग्रंथालय, उच्च न्यायालय, मुंबई. [२][व नागपूर] [३][* * * * *] | सर्व तरतुदी] |
| [४][६ल. | इंडियन टेलिफोन इंडस्ट्रीज लिमिटेडचे मुंबई शाखा कार्यालय, आर.ए.एफ.-बेस, डाक विभाग, क्वीन्स रोड, मुंबई-१. | सर्व तरतुदी] |
| [५][६म. | [६][एन. सी. कॉरपोरेशन प्रा. लि., मुंबई यांच्या आस्थापना] [७][आणि निड्स ऑफ लाईफ को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड यांची कार्यालये.] | सर्व तरतुदी] |
| [८][६न. | कॉफी मंडळाने चालविलेली युनिटे व कार्यालये. | सर्व तरतुदी] |
| [९][६ओ. | भारतीय औद्योगिक विकास बँक, मुंबई यांची कार्यालये. | सर्व तरतुदी] |
| ९[६प. | भारतीय युनिट ट्रस्ट, मुंबई | वरीलप्रमाणे] |

[१] शासकीय अधिसूचना, कामगार विभाग, क्रमांक ८/४८, दिनांक १७ मे, १९४९ अन्वये ही नोंद जादा दाखल करण्यात आली.

[२] शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्र. बीएसई/१४६१/एलएबी-तीन, दिनांक ३१ डिसेंबर १९६२ अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

[३] शासकीय अधिसूचना, कामगार व स्वयंरोजगार विभाग, क्र. बीएसई/१४५८/जे, दिनांक १८ मार्च १९५९ अन्वये ६ह, ६आय, ६ज, व ६क या नोंदी वगळण्यात आल्या.

[४] शासकीय अधिसूचना, विकास विभाग, क्रमांक ८/४८, दिनांक १५ जानेवारी १९५३ अन्वये ही नोंद जादा दाखल करण्यात आली.

[५] शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक बीसई-१४६२/एलएबी-तीन, दिनांक २४ ऑगस्ट १९६२ अन्वये ही नोंद जादा दाखल करण्यात आली.

[६] शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक बीएसई/१४६२/एलएबी-तीन, दिनांक २९ सप्टेंबर, १९६२ अन्वये "एन.सी. कॉर्पोरेशनचे कार्यालय, स्टेडियम हाऊस, मुंबई" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[७] शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक बीसई-१४६५/एलएबी-तीन, दिनांक ८ मे, १९६५ अन्वये हे शब्द दाखल करण्यात आले.

[८] शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक बीसई-१४६५/सीआर-७२५/एलएबी-पाच, दिनांक १० मे, १९७७ अन्वये ही नोंद जादा दाखल करण्यात आली.

[९] शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक बीसई-१४७८/सीआर-२३४७/एलएबी-५, दिनांक २२ डिसेंबर, १९७८ अन्वये या नोंदी जादा दाखल करण्यात आली.

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ७. | [१] [आलेला माल स्वीकारणे, सुपूर्द करणे, हलविणे, किंवा पाठविणे किवा रेल्वे किंवा परिवहनाची इतर साधने याद्वारे प्रवाशांना प्रवासात सहाय्य करणे, हीच केवळ कामे करणाऱ्या आस्थापनेतील कर्मचारी] | कलमे १०, ११, १३ ते १८ (दोन्ही धरून) [२][पुढील शर्तीच्या अधीनतेने संबंधित कर्मचाऱ्यांना आठवड्यातून १ दिवस सुट्टी त्यांच्या वेतनातून त्या सुट्टीदाखल कोणतीही रक्कम वजा न करता मंजूर करण्यात यावी.] |
| ८. | कोणत्याही आस्थापनेच्या परिवास्तूच्या बाहेर माल स्वीकारणे व सुपूर्द करणे, किंवा वाहून नेणे हीच केवळ कामे करणाऱ्या आस्थापनेवरील कर्मचारी. | [३][कलमे १०, ११, १३ ते १८ (दोन्ही धरून) आणि कलम २१ व २४ पुढील शर्तीच्या अधीनतेने संबंधित कर्मचाऱ्यांना आठवड्यातून १ दिवस सुट्टी, त्यांच्या वेतनातून त्या सुट्टीदाखल कोणताही रक्कम वजा न करता मंजूर करण्यात यावी.] |
| ९. | [४][ औषधविक्रेते व औषधिद्रव्यविक्रेते यांच्या आस्थापना. ] | [५][कलमे १०, ११, १३ ते १८ (दोन्ही धरून) ] [६][पुढील शर्तीच्या अधीनतेने संबंधित कर्मचाऱ्यांना आठवड्यातून एक दिवस सुट्टी, त्यांच्या वेतनातून त्या सुट्टीदाखल कोणतीही रक्कम वजा न करता मंजूर करण्यात येईल. ] [७][ आणि औषधे व औषधिद्रव्ये याखेरीज अन्य कोणत्याही वस्तू विकण्यासाठी उक्त कलमाच्या तरतुदीची माफी दिली जाऊ नये.] |
| १०. | [८][ कोणत्याही स्वरूपाच्या वैद्यकीय सेवा पुरविणाऱ्या आस्थापना. | कलमे १०, ११, १३, ते १८ व ३३ पुढील शर्तीच्या अधीनतेने,--- (एक) कार्यकाल योजन १४ तासांपेक्षा अधिक असू नये. |

